# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०१६ / फाल्गुन २५, १९३७ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १२५**

---

### उच्च माध्यमिक विभागाच्या पायाभूतपेक्षा वाढीव पदांच्या मान्यतेबाबत व मंजूर पदांच्या वेतनाबाबत

**(१) * १५८८७ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.कपिल पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१०-२०११ अखेर उच्च माध्यमिक विभागाच्या पायाभूतपेक्षा वाढीव ३३४ पदांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर केलेले वेतन अनुदान केव्हा अदा करण्यात आले आहे व केव्हा पासून,

(२) असल्यास, शासनाने मान्यता दिलेल्या उर्वरीत सुमारे ६०० पदांना वेतन अनुदान अद्यापही मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,

(३) सन २०११-२०१२ ते सन २०१४-१५ अखेरच्या उच्च माध्यमिकच्या पायाभूतपेक्षा वाढीव पदांची विभाग निहाय संख्या किती आहे,

(४) सदरचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी शिक्षण संचालनालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे यांचेकडून शासनास केव्हा प्राप्त झाले आहेत,
(५) प्रस्ताव प्राप्त झाले असल्यास, अद्यापही या प्रस्तावांना मान्यता न देण्याची कारणे काय आहेत व सदरच्या प्रस्तावांना केव्हा मान्यता दिली जाणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दिनांक ५.२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार ३३४ पदांना माहे फेब्रुवारी, २०१६ पासून वेतन सुरु करण्यात आले आहे.
(२) सदर पदांबाबत भरती प्रक्रिया विहित मार्गाने न झाल्याने तसेच बिंदूनामावलीनुसार पदे नसल्याने वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे सदर पदांना वेतन अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही.
(३) सन २०११-१२ ते २०१३-१४

| अ. क्र. | विभाग | पूर्णवेळ | अर्धवेळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | १०८ | ७९ | १८७ |
| २ | पुणे | ७५ | ६३ | १३८ |
| ३ | अमरावती | ०५ | ०२ | ०७ |
| ४ | औरंगाबाद | २७ | १९ | ४६ |
| ५ | नागपूर | ०८ | १० | १८ |
| ६ | नाशिक | ६५ | ०६ | ७१ |
| ७ | मुंबई | ६४ | ३० | ९४ |
| ८ | लातूर | ४० | ०९ | ४९ |
| | एकूण | ३९२ | २१८ | ६१० |

(४) शिक्षण संचालनालयाच्या दिनांक ७.७.२०१४ व दि. ३०.५.२०१५ च्या पत्रान्वये वाढीव पदांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.
(५) सदर वाढीव पदांबाबतच अधिकची माहिती क्षेत्रिय कार्यालयाकडून मागविण्यात आलेली आहे.

-----------------

**राज्यातील अनुदानित व शासकीय शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२) * १४९६४ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित व शासकीय शाळांमध्ये गेली अनेक वर्षे मोठया प्रमाणावर रिक्त पदे असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सदर रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) दिनांक २० जून, २०१४ व दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीस परवानगी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मराठी तरुण ‘केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या’ परिक्षेत यशस्वी व्हावा यासाठी ‘कॅच देम यंग’ योजना राबविण्याबाबत**

**(३) * १६२१७ प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी तरुण ‘केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या’ परिक्षेत यशस्वी व्हावा यासाठी सन २००६ साली माजी मुख्य सचिव, श्री.अरुण बोंगीरवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून ‘कॅच देम यंग’ ही योजना तत्कालीन शासनाने तयार केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हुशार मुलांवर शाळांपासून लक्ष ठेवणे, विद्यापीठांमध्ये प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणे आणि यशदाला शिखर संस्था बनवून शासकीय सनदी परिक्षा संस्थांच्या बळकटीकरणाचा निर्णयही घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'कॅच देम यंग' ही योजना शासनाने बंद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याची कारणे काय आहेत व ही योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) सन २००६ साली माजी मुख्य सचिव श्री.अरुण बोंगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सनदी परीक्षेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व वाढविण्याच्यादृष्टीने करावयाच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने, विद्यार्थ्यांना नागरी सेवा व इतर स्पर्धा परीक्षांची माहिती देणे, यशदा, पुणे या संस्थेला शिखर संस्थेची जबाबदारी देणे, तसेच शासकीय प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण करण्याबाबत शिफारसी केलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शाळेतील शिक्षकांचे नियुक्ती/पद भरतीस मान्यता देण्याबाबत**

**(४) * १५१७० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी व्यवस्थापन व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे नियुक्ती/पद भरतीस मान्यता न देण्याचे परिपत्रक शासनाकडून माहे जानेवारी, २०१६ मध्ये निर्गमित करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षापासून प्रलंबित मान्यता असलेल्या शिक्षकांच्या बाबतीत तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील रिक्त पदांची भरती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पदभरतीवरील निर्बंध माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये उठविण्यात आले आहेत.

-----------------

**जूनी व नवीन पेन्शन योजना लागू नसलेल्या शिक्षक, शिक्षकेतर मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना मदत मिळणेबाबत**

**(५) * १५१२० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जूनी अथवा नवीन अंशदायी योजना लागू नसलेल्या पण सेवेतच मृत्यू पावलेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचा-यांच्या कुटुंबियांना भविष्य निर्वाह निधी किंवा कोणतेही सेवानिवृत्ती वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर शिक्षक व कर्मचा-यांच्या कुटुंबियांना मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानित शाळेत नियुक्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जूनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू आहे. दि.१ नोव्हेंबर, २००५ नंतर १००% अनुदानित शाळेत नियुक्त कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू आहे. दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशत: अनुदानित/विनाअनुदानित शाळेत नियुक्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबतची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

----------------

**शासकीय कर्मचारी आणि अनुदानित शाळेतील शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेली सेवानिवृत्ती वेतन योजनेबाबत**

**(६) * १५१८१ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १२३८७ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वित्त व नियोजन विभागाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ रोजी व शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० ला शासन निर्णय निर्गमित करुन शासकीय कर्मचारी आणि अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू असलेली सेवानिवृत्ती वेतन योजना १९८२ व भविष्य निर्वाह निधी योजना दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ पासून संपुष्टात आणली व त्याऐवजी नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृती वेतन योजना लागू केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नवीन परिभाषित योजनेमुळे दिनांक १ नोव्हेंबर, २००५ किंवा त्यानंतर नियुक्ती झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदान शाळा वर्गतुकड्या तसेच अंशत: अनुदानित शाळेत कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांना पूर्वी अस्तित्वात असलेल्या सेवानिवृत्ती वेतन योजना १९८२ आणि भविष्य निर्वाह निधी योजनेच्या लाभापासून वंचित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करतांना विधान मंडळात चर्चा करुन विधान मंडळाची मंजुरी न घेता शासन निर्णय निर्गमित करणे ही बाब असंवैधानिक असून नैसर्गिक न्यायाच्याविरुध्द आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वी लागू केलेली सेवानिवृत्ती वेतन नियमावली १९८२ व भविष्य निर्वाह निधी नियमावली ही विधान मंडळाने मंजूर केलेल्या कायद्यानुसार तयार करण्यात आली असल्याने नवीन शासन निर्णय निर्गमित करुन ही योजना रद्द करणे म्हणजे कायद्यात हस्तक्षेप करुन विधान मंडळाच्या घटनात्मक अधिकारात हस्तक्षेप करणारी असून विधान मंडळाचा अवमान करणारी बाब आहे, हे ही खरे आहे काय,

(५) या प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी व त्यापूर्वी अनेक वेळा शासनास पत्र पाठवून नवीन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजना रद्द करण्याची मागणी करुन जूनीच सेवानिवृत्ती वेतन योजना पूर्ववत चालू ठेवण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) दिनांक १ नोव्हेंबर, २००५ किंवा त्यानंतर १००% अनुदानित शाळांवर नियुक्त शिक्षक कर्मचाऱ्यांना तसेच दि.१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अंशत: अनुदानित / विना अनुदानित / कायम विनाअनुदानित शाळा / वर्ग/ तुकड्यांवर नियुक्त शिक्षक कर्मचाऱ्यांना सुद्धा नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.
(३) हे खरे नाही.

तत्कालीन वित्तमंत्री यांनी राज्याचा सन २००२-२००३ चा अर्थसंकल्प विधानमंडळात सादर करताना केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये शासनाच्या सेवेत नव्याने रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सध्याच्या निवृत्तीवेतन योजनेऐवजी अंशदायी निवृत्तीवेतन योजना तयार करुन लागू करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. राज्य शासनाने दि.१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर व तत्कालीन वित्त मंत्री यांनी सन २००२-०३ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केलेल्या घोषणेनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि. ३१.१०.२००५ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. तसेच भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन या संदर्भातील अधिसूचना मा.राज्यपालांच्या मान्यतेने दि.३१.१०.२००५ अन्वये निर्ममित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) होय.
(६) योजना सुधारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कॅशलेस योजना लागू करण्याबाबत**

**(७) * १५८७४ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांची रुपये २ लाखापर्यंतची वैद्यकीय खर्चाची देयके मंजूर करण्याचे अधिकार शिक्षणाधिकाऱ्यांच्या ऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना देण्यात आलेले असल्यामुळे संबंधित देयकावर नेमकी स्वाक्षरी कोणी करायची व ती कशापध्दतीने मंजूर करायची याकारणास्तव राज्यातील हजारो शिक्षक-कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके जिल्हापरिषदेमध्ये मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी ही दोन्ही महत्वाची पदे शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली येत असल्याने रुपये २ लाखापर्यंतची वैद्यकीय देयके मंजूर करण्याचा अधिकार हा शिक्षणाधिकाऱ्यांना व रुपये ३ लाखापर्यंतची वैद्यकीय देयके मंजूर करण्याचा अधिकार शिक्षण उपसंचालकांना देवून वैद्यकीय देयकासाठी होत असलेली शिक्षक-कर्मचाऱ्यांची ससेहोलपट थांबवावी अशी मागणी औरंगाबाद विभागाचे लोकप्रतिनिधींनी एका निवेदनाद्वारे मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच गृह विभागाप्रमाणे शिक्षक-कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयकासाठी कॅशलेस योजना लागू करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे, तथापि, शासन निर्णय दिनांक १८ सप्टेबर, २०१५ या विभागाच्या दिनांक १६ जानेवारी, २०१६ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आले आहेत.

(२) हे खरे आहे,

(३) होय,

(४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात तासिका तत्वावरील प्राध्यापकांना प्रतिमहा मानधन देण्याबाबत**

**(८) * १४९२८ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १२४६२ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापकांची ३०% पदे रिक्त असल्याने तासीका तत्वावर प्राध्यापकांची पदे भरली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तासिका तत्वावरील प्राध्यापकांना आठवडयात फक्त ७ तास व प्रति तास रुपये २५०.०० मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राध्यापकांचे मानधन प्रतिमहा न देता वर्षाला एकदाच दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांचे मानधन दरमहा मिळण्यासाठी तसेच आठवडयाला १४ तास व प्रति तास रुपये ५०० मानधनासह प्रतिमहा मानधन देणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

वरिष्ठ महाविद्यालयात सुमारे २० टक्के पदे रिक्त असून सदर रिक्त पदे तासिका तत्वावर भरली जातात.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत विचार करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील विविध गावठाण व झोपडपट्टी परिसरातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * १४७०८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ११२८९ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नवी मुंबईतील महापालिकेची आरोग्य व्यवस्था कोलमडली असून विविध गावठाण व झोपडपट्टी परिसरात तब्बल २७ बोगस डॉक्टर कार्यरत असल्याचे व ३३४ डॉक्टरांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व बोगस डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई, यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुसार उक्त महानगरपालिकेच्या क्षेत्रातील एकूण २७ व्यक्तींविरुध्द अवैध वैद्यक व्यवसाय केल्याबद्दल वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, अवैध वैद्यक व्यवसायींचा शोध घेण्याची कार्यवाही नवी मुंबई महानगरपालिका प्रशासन नियमितपणे करत आहे. आतापर्यंत ९०४ खाजगी वैद्यक व्यवसायींची कागदपत्रे पडताळणीसाठी प्राप्त झाली आहेत. एकूण ३३४ व्यक्तींची कागदपत्रे अपूर्ण आढळून आली आहेत. परंतु, उक्त ३३४ व्यक्ती हे नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी आहेत.

(२) व (३) उक्त ३३४ व्यक्तींना आपली उर्वरित कागदपत्रे दिनांक १०.०३.२०१६ पर्यंत सादर करणेबाबत नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नोटीसा बजावल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खोंडामळी व बारागाव (ता.जि.नंदुरबार) येथील**
**पाणीपुरवठा योजनेचे काम बंद असल्याबाबत**

**(१०) * १६१०४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी : तारांकित प्रश्न क्रमांक १३०४० ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोंडामळी व बारागाव (ता.जि.नंदुरबार) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या १० वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंद पडलेले काम सुरु करुन त्याला गती देण्याबाबत दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे काम त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर योजना हस्तांतरित झाली नसल्याने योजना पुनर्जिवित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जळगांव यांनी तयार करुन जिल्हा परिषद, जळगांव यांच्या स्वीकृतीबाबतची कार्यवाही सुरू आहे, त्यास अनुसरुन जिल्हा परिषद व योजनेत समाविष्ट गावांना योजना स्वीकृती व देखभाल दुरुस्ती बाबतचा ठराव पारीत करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जळगांव यांनी दिनांक १५.२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदेला कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आडगांव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील बांधकामाबाबत**

**(११) * १४६०३ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ९८६० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगांव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील इमारत बांधकामाबाबतची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, बांधकामाची सद्यस्थिती काय आहे व सदरील बांधकाम केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, गेल्या १४ वर्षापासून संपादित जागेवर इमारत बांधकामास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. राज्यमंडळाने ठराव पारीत केल्यानुसार प्रस्तावित इमारत बांधकामासाठी नियुक्त वास्तुविशारद यांना कार्यादेश पत्र देण्याची तसेच या कामासाठीचा करारनामा त्वरित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात ७ प्रादेशिक विभागात धाडी टाकून जीवनावश्यक वस्तू ताब्यात घेतल्याबाबत**

**(१२) * १४७४८ श्री.संजय दत्त, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७ प्रादेशिक विभागात ५५९२ ठिकाणी धाडी टाकून डाळ, तेल, तेल बियाणे इ. ५३९ कोटी ५० लाख १५ हजार ७४५ रुपयांच्या जीवनावश्यक वस्तू ताब्यात घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जप्त केलेला माल व्यापाऱ्यांना परत करुन त्यांच्या विरोधात अवैध साठी प्रकरणी व माल जप्त करताना नोंदविण्यात आलेले गुन्हे माफ करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यभर ५५९२ साठेबाजींवर धाडी टाकण्यात आल्या असल्या तरीही यासंदर्भात दाखल केलेल्या गुन्हयांची संख्या फक्त ५० असल्याची तसेच जप्त केलेल्या डाळ व तेलापैकी ७० टक्के माल व्यापाऱ्यांना परत केल्याची माहिती श्री.गलगली यांनी मागविलेल्या माहितीच्या अधिकारातून माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यभर ५५९२ धाडी टाकून गुन्हयांची संख्या कमी असल्याबाबत कार्यवाही व बेकायदा जीवनावश्यक वस्तूंची साठवणूक करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर जप्त केलेला माल परत करण्याची व जप्त केलेल्या वस्तूंची रास्त भावाने विक्री करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) राज्य शासनाने दिनांक १९/१०/२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बिया या जीवनावश्यक वस्तूंवर दिनांक ३०/९/२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत. त्यास अनुसरुन क्षेत्रिय कार्यालयांनी कार्यवाही केली.

आयातदारांना साठा निर्बंध लागू नसल्याने, कार्यवाही दरम्यान जप्त केलेल्या साठ्यांपैकी आयातदारांचा जप्त केलेला साठा शासनाच्या दिनांक ३०/१०/२०१५ च्या पत्रान्वये मुक्त करण्यात आला आहे.

बाजारात तूरडाळीची आवक कमी असल्याने भाववाढ नियंत्रित करण्याच्या दृष्टीकोनातून, जप्त केलेल्या तुरीची तूरडाळ करून ती बाजारात विक्रीसाठी तात्काळ येणे आवश्यक होते.

त्यामुळे जप्त करण्यात आलेला तूर/तूरडाळीचा साठा संबंधित व्यापाऱ्याकडून Indemnity Bond घेऊन, त्याला परत करण्याबाबत दिनांक २४/११/२०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले. या शासन निर्णयान्वये मुक्त केलेली तूरडाळ व मुक्त केलेल्या तूरीच्या भरडाईनंतर तयार झालेली तूरडाळ महाराष्ट्र राज्यातच रु.१००/- प्रतिकिलो या दराने ग्राहकास

विकली जाईल, तसेच मुक्त केलेले कडधान्य महाराष्ट्र राज्यातच विकले जाईल या अटीवर Indemnity Bond घेऊन कार्यवाही करण्यात यावी व संबंधित व्यापाऱ्यांनी indemnity Bond भरुन देण्यास नकार दर्शविल्यास जप्त केलेल्या कडधान्याच्या साठ्याचा जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील तरतूदीनुसार जाहिर लिलाव करण्यात यावा, असे निर्देश सर्व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आले. सदर शासन निर्णयास अनुसरुन जप्त करण्यात आलेला डाळी/कडधान्याच्या साठ्यापैकी बहुतांशी साठा indemnity Bond घेऊन मुक्त करण्यात आला आहे.

जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत लागू असलेल्या साठा निर्बंधाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी, याबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक २९/२/२०१६ च्या पत्रान्वये पुन्हा एकदा सूचना देण्यात आल्या आहेत.

जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्तीस एम.पी.डी.ए. (The Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords. Bootleggers & Drug-Offenders, Dangerous Person & Video Pirates) Act, १९८१ लागू करण्याबाबतचा दिनांक १/१२/२०१५ रोजी अध्यादेश काढण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत

**(१३) * १४९४४ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ८०५० ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याकरिता नाशिक विकास कार्यक्रमांतर्गत दि. २७ ऑगस्ट, २००९ रोजी १० कोटी नियतव्यय निश्चित केल्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि. ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी मुंढेगाव, ता.इगतपुरी येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरीत करण्याकरिता महसूल व वन विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चित्रपटसृष्टीसाठी सांस्कृतिक कार्य विभागास जमिनीचे हस्तांतरण करून सदर चित्रपटसृष्टीचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी जागेशी संबंधित कागदपत्रे महामंडळास पाठविली आहेत. प्रस्तावित जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यास महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली असून त्याप्रमाणे त्या विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**नागपूर अंबाझरी तलावात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरात कंपन्यांचे विषारी पाणी येत असल्याबाबत**

**(१४) * १६२६६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया : तारांकित प्रश्न क्रमांक ८२८० ला दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर अंबाझरी तलावात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरामधील कंपन्यांचे विषारी पाणी येत असल्याने पाणी प्रदूषित झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाडी नगरपंचायतीचे गटार लाईनचे दूषित पाणी सुध्दा अंबाझरी तलावात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, वाडी येथे सिव्हेज ट्रिटमेंट प्लांट तयार करण्यासाठी तसेच अंबाझरी तलावामध्ये होणारे प्रदूषण रोखण्यासाठी सदर तलावाचा राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ऑगस्ट, २०१५ व फेब्रुवारी, २०१६ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणानुसार अंबाझरी तलावत औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरातून औद्योगिक सांडपाणी जात नसल्याचे आढळून आले. परंतु वाडी नगरपरिषद क्षेत्रातील विना प्रक्रिया घरगुती सांडपाणी तलावामध्ये जात असल्याचे आढळून आले.

(४) वाडी नगरपरिषदेमार्फत सिव्हेज ट्रिटमेंट प्लांट (STP) चा प्रस्ताव तयार करण्यात येत असून अंबाझरी तलाव संवर्धनाचा प्रस्ताव राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेत समाविष्ट करण्यासाठी केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुण्यातील बालचित्रवाणीचे पुनरुज्जीवन करणेबाबत**

**(१५) * १५८२८ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये, अॅड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३८ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील बालचित्रवाणीच्या सक्षमीकरणासाठी शासनाने माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शिक्षण आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नेमून सदर समितीने आपला अहवाल ६ महिन्यात शासनास सादर करावा, असा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ६ महिन्यात सदर समितीची एकही बैठक झाली नसल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बालचित्रवाणीचे पुनरुज्जीवन होवून सक्षमीकरणाच्या गती देण्याची गरज असताना त्यासाठी नेमलेल्या समितीने एकही बैठक न घेण्याचे कारण काय आहे,

(४) तसेच सदर समितीच्या स्थापने पासून ते माहे जानेवारी, २०१६ अखेर पर्यंत समितीच्या सदस्यांवर व अन्य कामकाजासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे,

(५) तसेच बालचित्रवाणीच्या सक्षमीकरणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय

(२) व (३) दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी बैठक घेण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) सदर संस्था खाजगी लोकसहभागातून सक्षम करण्यासाठी प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास अभिप्रायास्तव सादर करण्यात आले आहे.

-----------------

**राज्यात शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबत**

**(१६) * १५२३६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.अनिल परब, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १२२९४ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजाच्या विविध वंचित घटकातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी माहे जुलै, २०१५ मध्ये करण्यात आलेल्या शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणात ५५ हजार मुले आढळून आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ५५ हजार मुले शाळाबाह्य आढळून आल्यानंतरही त्यापैकी एकाही विद्यार्थ्याचा चालु शैक्षणिक वर्षात शाळेत प्रवेश न झाल्याने त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे शहरात साधारण अडीच हजार मुले शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले होते, त्याबाबत स्वयंसेवी संस्थांनी आक्षेप घेतल्यानंतर मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची मोहिम थंडावली असून नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक वर्ष संपत आले तरीही शाळेत दाखल झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वारंवार शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्यात येऊनही त्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यात अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील शाळा बाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पुन्हा फेरमोहीम सुरु करण्याचे शासनाने ठरविले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात कोणकोणत्या जिल्हयात सदर मोहिम राबविली आहे,

(७) असल्यास, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच फेरपरिक्षा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षणात १६८३ बालके आढळली असून सदर मुलांना शाळेत प्रवेशासाठी दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

(६) सर्व जिल्ह्यात सदर मोहिम राबविली जात आहे.

(७) शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने २० मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षणाचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाचे निर्देश दिले आहेत. तसेच २७.०७.२०१५ ते ३१.०७.२०१५ व ३१.०१.२०१६ अखेर वर्षभरात वारंवार सर्वेक्षण करण्यात आली आहेत. दिनांक ३१.०१.२०१६ अखेर झालेल्या सर्वेक्षणात ७४,९७१ शाळाबाह्य मुले आढळली असून त्यापैकी ४९,३३९ मुलांना नियमित प्रवेश देऊन दाखल करण्यात आले आहे. बाकीच्या शाळाबाह्य मुलांनाही शाळेत दाखल करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे अतिदक्षता विभाग बांधण्याबाबत**

**(१७) * १५२५० श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ११०३९ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे अतिदक्षता विभाग बांधण्याबाबत प्रस्ताव मंजूर केव्हा झाला,

(२) असल्यास, सदरहू बांधकाम प्रत्यक्षात केव्हा सुरु झाले,

(३) तसेच सदर महाविद्यालयात ई-लायब्ररीचे बांधकाम केव्हा सुरु झाले व ट्रामा केअर सेंटरची सद्यस्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त सर्व कामाच्या विलंबाकरिता दोषी असणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शासन निर्णय क्र. जीएमएन-२०१०/प्र.क्र.३०९/१०/प्रशा-१. दिनांक १२/०१/२०११ अन्वये सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि सदर बांधकामाला सुरुवात झालेली नाही. याविषयी सुधारित अंदाजपत्रकासह शासनास प्राप्त प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) ई-लायब्ररीचे बांधकाम दिनांक २.५.२०११ रोजी सुरु झाले व इमारत वापरात आहे. ट्रामा केअर सेंटरचे बहुतांश बांधकाम पूर्ण झाले असून ट्रान्सफार्मर, अंतर्गत रस्ते व कंपाऊन्ड वॉलचे बांधकाम प्रगती पथावर आहे.

(४) व (५) बांधकामाची जागा निश्चित करण्यास झालेल्या विलंब, तसेच प्रस्तावित जागेवरील ६३ झाले तोडण्यास नागपूर महानगरपालिकाकडून परवानगी मिळण्यास झालेला विलंब, या सर्व प्रक्रियेमध्ये झालेला कालापव्यय यामुळे अंदाजपत्रकाच्या किंमतीमध्ये वाढ होणे, नव्याने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे इत्यादी कारणांमुळे बांधकामास विलंब झाला. त्यामुळे कोणावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती वाटपात केलेला गैरव्यवहार

**(१८) * १५१८३ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.रामनाथ मोते, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंत्रशिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या सन २००९-१० ते २०१४-१५ या वर्षात खाजगी पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये कागदोपत्री बोगस प्रवेश नोंदवून व परिक्षेला न बसलेल्या विद्यार्थ्यांच्या नावे शिष्यवृत्ती वाटप करुन सदर शिष्यवृत्ती संस्थाचालकांनी शासनाचे ५०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती घेऊन गैरव्यवहार केल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीत जवळपास ६,८८,१९८ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतलेला असताना फक्त ४,७७,९३६ इतकेच विद्यार्थी परिक्षेला बसलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित २,१०,२६२ विद्यार्थी परिक्षेत बसलेले नसतांना मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, बोगस नांवे दाखवून शिष्यवृत्ती घेणा-या संस्थांवर व पॉलिटेक्निक कॉलेजवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, अंशत: खरे आहे. शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीबाबतच्या अनियमिततेबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) शैक्षणिक वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीमध्ये एकूण ७,६२,१४५ इतक्या विद्यार्थ्यांनी खाजगी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला असुन त्यांची नोंदणी केलेली आहे.

तसेच नोंदणी Enrollment) केलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण ७,२८,२८० इतके विद्यार्थी हिवाळी परीक्षेस व ५,४४,९१४ इतके विद्यार्थी उन्हाळी परीक्षेस बसले होते.
(३), (४), (५) व (६) विविध शिष्यवृत्ती वाटपात गैरव्यवहार झाले किंवा कसे हे तपासण्यासाठी गृह विभागाने दिनांक १५/१/२०१६ च्या आदेशांन्वये विशेष चौकशी पथकाची स्थापना केली आहे.

-----------------

**बोरगांव मंजू (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) गावांत व ८४ खेड्यात नळपाणी पुरवठा सुरु करण्याबाबत**

**(१९) * १५१३१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगांव मंजू (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील राष्ट्रीय महामार्गावर आलेल्या ८४ खेडी व गावांतील सुमारे ३५,००० च्यावर असलेल्या लोकसंख्येकरिता नळपाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नळपाणी पुरवठा योजना सद्य:स्थितीत बंद असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर नळपाणी पुरवठा योजना तात्काळ सुरु करण्याबाबत स्थानिक जनतेनी स्थानिक पोलीस स्टेशनवर मोर्चा, आंदोलन करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना कायमस्वरुपी पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) पाणी टंचाई कार्यक्रम अंतर्गत तात्पुरती पुरक नळ योजनेव्दारे पाणी टंचाईच्या निकषाप्रमाणे ६४ गावांना १५ दिवसाआड पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सुकळी तलाव येथून सदर योजना कायमस्वरुपी पूर्ववत सुरु ठेवणेसाठी रु.१३,७६,५९,४००/- चे सविस्तर अंदाजपत्रक जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत तयार करुन अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अकोला यांचेकडे दि. १७.०२.२०१६ रोजी सादर केला असून, सदर प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, अमरावती यांचेकडे दि. २४.०२.२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दारिद्र्यरेषेखालील अन्न सुरक्षा कायद्यानुसार स्वस्त दरात अन्न धान्य देण्याबाबत

**(२०) * १५३३१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.माणिकराव ठाकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११५७८ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दारिद्र्यरेषेखालील सुमारे १ कोटी ७७ लाख गरीबांना अन्न सुरक्षा कायद्यानुसार स्वस्त दरात अन्न धान्य देण्याबाबत निर्णय घ्यावा असा आदेश दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या सुनावणीच्या वेळी राज्य शासनास दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) व (३) सध्या राज्यामध्ये सुरु असलेल्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत दिनांक १५ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

**विद्यार्थ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी योग्य प्रशिक्षण देण्याबाबत**

**(२१) * १५४१६ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा कमी मार्क पडत असल्यामुळे नैराश्येपोटी नापास होण्याच्या भितीने विद्यार्थी आत्महत्या करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी त्यांना योग्य ते प्रशिक्षण मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही

(२) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या ताणतनावापासून मुक्त राहण्यासाठी राज्य परीक्षा मंडळामार्फत वर्तमानपत्र व इतर प्रसिध्दी माध्यमांद्वारे समुपदेशकांचे भ्रमणध्वनी क्रमांक जाहिर करुन विद्यार्थ्यांना ताणतनाव नियंत्रणासाठी सल्ला व समुपदेशन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे भूगाव (जि.वर्धा) येथे उत्तम गल्वा मेटॅलिक या कंपनीच्या रासायनिक पाण्यामुळे जल व वायुप्रदुषणामुळे गावकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याबाबत**

**(२२) * १४९९२ ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भुगांव (जि.वर्धा) येथे उत्तम गल्वा मेटॅलिक (पूर्वीची लॉयडस स्टिल) ही कंपनी सन १९९२ पासून चालू असून या कंपनीच्या उत्पादनाच्या रासायनिक पाण्यामुळे मौजे बरबडी, भूगाव, चितोड, झंझापूर, सेलू-काटे व अन्य गावांमध्ये जल तसेच वायुप्रदुषणाचा परिणाम झाल्याने तेथील नागरिकांना अस्थमा, हृदयविकार, वातरोग, मूळव्याध आणि मूतखडा इत्यादी विकार होऊन त्यापैकी काही ग्रामस्थ मृत्यूमुखी पडल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याखेरीज मौ. भूगावच्या अंगणवाडीतील प्रवेशित ५० बालकांपैकी २४ बालके कुपोषित असल्याचे व या बालकांना वर्धा येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उन्हाळ्यात स्लॅग जमा करणे हे नियमबाह्य व शासन आदेशाचे उल्लंघन करणारे असतानाही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे आदेश डावलून कंपनीमार्फत स्लॅग जमा करण्यात येत असल्यामुळे तेथील रासायनिक प्रक्रियेमुळे पाणी झिरपून त्या परिसरातील झाडेझुडपे मृत पावून जमिनी देखील नापिक होणे, तसेच त्या विरोधात समस्त ग्रामस्थांनी व काही राजकीय पक्ष कार्यकर्त्यांनी एकत्रित मिळून दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी मोर्चा काढून जिल्हाधिकारी, वर्धा व मा.पर्यावरण राज्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीस अधिवेशन कालावधी समाप्तीनंतर प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करण्याचे मा.पर्यावरण राज्यमंत्री यांनी सभागृहास दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आश्वासन दिल्यानुसार मा.पर्यावरण राज्यमंत्री महोदयांनी सदर कंपनीस भेट देवून पाहणी केली आहे काय, असल्यास, केव्हा,

(५) त्यानुसार संबंधित उत्तम गल्वा मेटॅलिक कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी मोर्चा काढून जिल्हाधिकारी, वर्धा व मा. पर्यावरण राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर करण्यात आले, हे खरे आहे.

(४) व (५) मा. पर्यावरण राज्यमंत्री यांनी सदर कंपनीस अद्याप भेट दिलेली नाही. तथापि, मा. पालकमंत्री यांच्या सूचनेनुसार मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांनी मा. उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे अध्यक्षतेखाली सदर उद्योगामुळे होत असलेल्या प्रदूषणाबाबत चौकशी करण्यासाठी दि. ०५.०१.२०१६ रोजी समिती गठीत केली. या समितीने दि. १४.०१.२०१६ रोजी सदर उद्योगास भेट देऊन मौका पाहणी केली असून समितीने भेटीचा अहवाल मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांना दि. ०२.०३.२०१६ रोजी सादर केला असून त्यामध्ये उद्योगाने घ्यावयाच्या काळजीबाबत पुढील शिफारशी केल्या आहेत.

अ) सदर कंपनीच्या मागील बाजूस साठवणूक करण्यात आलेल्या स्लॅगची शास्त्रोक्त पध्दतीने कालबध्द कार्यक्रमाअंतर्गत विल्हेवाट लावण्यात यावी.

ब) संमतीपत्रातील अटी व शर्तीनुसार हवा व जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा प्रभावी पध्दतीने चालविण्यात यावी. जेणेकरुन दुषित घटकांचे उत्सर्जन होणार नाही.

क) औद्योगिक सांडपाणी संयंत्रणाची दुरुस्ती व पुर्नबांधणी करणेबाबत कालबध्द कार्यक्रम सदर उद्योगाने सादर करावा व त्याची पुर्तता सहा महिन्यात करावी.

-----------------

**तूरडाळीसह राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(२३) * १५७०० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तूरडाळीसह राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने जीवनावश्यक वस्तूंच्या दराबाबत कायदा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय.

डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याकरीता नियंत्रण कायदा तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गालंग्री (ता.जि.बीड) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(२४) * १६१६३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गालंग्री (ता.जि.बीड) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत ७० लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली होती, यापैकी ४९ लाखांच्या कामाला प्रशासकीय मंजूरी देऊन विभागाने ३८ लाख रुपये निधी अध्यक्ष व सचिवांच्या नावे दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे ३८ लाख रुपयांचे काम पूर्ण करायचे आदेश असतानाही फक्त १९ लाख रुपयांचे काम झाल्याचे मुल्यांकनावरुन निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही कार्यकारी अभियंता, श्री.चव्हाण यांचेकडून गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष, सचिव यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. संबंधित समितीचे अध्यक्ष/सचिव यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यात सेमी इंग्रजी शाळांच्या धोरणाबाबत**

**(२५) * १४६८४ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक संस्थाच्या आणि मराठी माध्यमाच्या अनेक शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सर्रास सुरु केल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सेमी इंग्रजी शाळांना मान्यता देण्याचे अधिकार हे प्राथमिक शिक्षण संचालकांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरहू शाळेत किमान एक शिक्षक इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण झालेला असावा किंवा शिक्षणशास्त्र विषयाची पदवी अभ्याक्रम इंग्रजी माध्यमातून केलेला असावा असा निकष ठरविला गेला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१३ मध्ये टीईटी मध्ये इंग्रजी माध्यमातील ९८ उमेदवार व सन २०१४ मध्ये १४ उमेदवार पात्र ठरले होते म्हणजेच सेमी इंग्रजी (खाजगी पूर्ण इंग्रजी) माध्यमाच्या शाळांसाठी पात्रताधारक शिक्षक उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पात्रताधारक शिक्षक पुरेसे उपलब्ध नसताना शिक्षण विभागाने पहिली सेमी इंग्रजी शाळा सुरु करतांना कोणत्या प्रकारचे निकष लावले गेले आहेत,

(६) असल्यास, राज्यात सेमी इंग्रजी शाळा किती आहेत व त्यातील किती शाळांना मान्यता देण्यात आली याचा संपूर्ण तपशील शिक्षण विभागाकडे उपलब्ध नसल्याचे महितीच्या अधिकारातून दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच सेमी इंग्रजी माध्यमांच्या शाळांबाबत धोरण आखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) अंशतः खरे आहे. तथापि, टीईटी ही परीक्षा दिनांक १३.२.२०१३ पासून आवश्यक करण्यात आली आहे. तत्पुर्वी इंग्रजी माध्यमातून डी.एड. झालेले व कार्यरत असलेले शिक्षक सेवेत आहेत.

(५) शासन निर्णय दिनांक १९.६.२०१३ अन्वये सेमी इंग्रजी शाळांबाबत निकष निश्चित करण्यात आले आहेत.

(६) अंशतः खरे आहे. शासन निर्णय दिनांक १९.६.२०१३ मधील तरतुदीनुसार ६३१ सेमी इंग्रजी प्राथमिक शाळांना मान्यता देण्याबाबत शिक्षण संचालनालयाकडून संबधित विभागीय शिक्षण उपसंचालकांना कळविण्यात आले आहे. तथापि, त्यापैकी प्रत्यक्ष किती सेमी इंग्रजी शाळा सुरु झाल्या याबाबत माहिती शिक्षण संचालनालय स्तरावर उपलब्ध नाही.

(७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) * १५९३५ श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक आणि दोन शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने ग्रामस्थांनी तसेच पालकांनी शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा परिषद अहमदनगर अंतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील मौजे काष्टी येथील जिल्हापरिषद प्राथमिक शाळा येथे मुख्याध्यापकाचे पद रिक्त आहे व प्राथमिक शिक्षकांची १२ पदे मंजूर असून प्राथमिक शिक्षकांचे १ पद रिक्त आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने बेकायदेशिररित्या कोटयवधी रुपयांची खरेदी केल्याबाबत**

**(२७) * १५७९५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास विभागाच्या शालेय शिक्षण विभागाच्या अतिरिक्त सचिव रिना रे यांनी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास, शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार यांना एक पत्र पाठवून त्या पत्रामध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने केलेली कोटयवधी रुपयांची खरेदी बेकायदा असल्याने त्यासाठी केंद्राकडून पैसे देता येणार नाहीत असे स्पष्टपणे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत खरेदी करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे व पध्दती केंद्र शासनाने दिनांक ९ जून, २०१४ रोजी सर्व राज्यांना कळवली असून, शिक्षण परिषदेने सन २०१४-१५ च्या वार्षिक आराखडयामध्ये १ कोटी २५ लाख २५ हजार ४४७ पुस्तके खरेदी करण्याचे निर्धारित केले होते, ही खरेदी नियमबाहय असून अखर्चिक निधी खर्च करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्यामुळे या दोन्ही नियमबाहय खरेदीसाठी निधी देता येणार नाही असेही या पत्रात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेने केलेली खरेदी बेकायदेशीर असून त्याकरिता केंद्र शासनाचा निधी वापरता येत नसल्याबाबतची माहिती असूनही, सदर खरेदी करणाऱ्या अधिका-याविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) सदर खरेदी नियमानुसारच करण्यात आलेली असून, नियमबाहय पध्दतीने खर्च करण्यात आलेला नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील शिक्षक व मुख्याध्यापकांचे इतर शाळांमध्ये समायोजन करण्याबाबत**

**(२८) * १५५५८ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात शासनाच्या पटसंख्येच्या निकषामुळे ७५३ शाळांमधील १ हजार ५०० शिक्षक व मुख्याध्यापकांची ४०० पदे अतिरिक्त ठरणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त ठरणा-या शिक्षक व मुख्याध्यापकांना इतर शाळांत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

३० सप्टेंबर, २०१४ च्या आस्थापना सुचीनुसार माहे जानेवारी, २०१६ अखेर सिंधुदुर्ग जिल्हयात मुख्याध्यापकांची ४०५ पदे अतिरिक्त ठरत असून शिक्षक संवर्गातील पदे अतिरिक्त ठरलेली नाहीत.

(२) व (३) प्रचलित नियमानुसार अतिरिक्त ठरलेल्या मुख्याध्यापकांचे समायोजन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील १३१ व चिपळूण तालुक्यातील १२ जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२९) * १४८४७ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.महादेव जानकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील १३१ तर चिपळूण तालुक्यातील १२ जिल्हा परिषद शाळा गळक्या व धोकादायक असल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या इमारती दुरुस्तीचा प्रस्ताव जिल्हा परिषद बांधकाम यांच्याकडे देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व शिक्षा अभियानांतर्गत सदर शाळांच्या दुरुस्तीचे अनुदान व निधी सन २०१३ पासून बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन व तदनुसार शाळांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हयात २७२ शाळा मोडकळीस आल्या असून त्यापैकी २२७ शाळांना निर्लेखनास मंजूरी देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत तसेच जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत निधी मंजूर झाल्यावर दुरूस्तीची कार्यवाही करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) ज्या शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत त्यातील विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था अन्य शासकीय इमारती, खाजगी इमारती यामध्ये केली जाते.

सर्व शिक्षा अभियान, जिल्हा वार्षिक योजना या व्यतिरिक्त सदर शाळांच्या इमारतींच्या दुरूस्तीसाठी, जिल्हा परिषद सेस अनुदान, सादिल अनुदान यामधून निधी मंजूर करण्यात येत आहे.

---

**पुणे येथे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी बनावट कागदपत्रे सादर करुन पुरस्कार मिळविणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३०) * १४७६१ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी बनावट कागदपत्रे सादर करुन पुरस्कार मिळविल्याबददल अधिका-याची शासकीय चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यास चौकशी सुरु असूनही पदावरुन निलंबित करण्यात आले नसल्याचे दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी बनावट कागदपत्रे सादर केलेल्या अधिकाऱ्यास निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कागदपत्रांची सत्यता पडताळणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत**

**(३१) * १५४८४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील सर्व तालुक्यांकडून पाणी टंचाईबाबतचे आराखडे जिल्हा परिषद स्तरावर पाठविण्यासाठी दिरंगाई होत असल्याने रत्नागिरी जिल्हयात तीव्र पाणी टंचाई निर्माण होत असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील प्रत्येक तालुक्यानी पाणी टंचाईचा आराखडा त्वरीत पाठविण्याबाबत तसेच पाणी टंचाईचा आराखडा पाठविण्यास दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) रत्नागिरी जिल्हयात सर्व तालुक्यांकडून संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडे सन २०१५-१६ जिल्हा परिषद स्तरावर दिरंगाईने प्राप्त झाले. ही बाब खरी आहे. परंतु अद्याप जिल्हयात पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली नाही.

(२) जिल्हयांतील प्रत्येक तालुक्यांनी पाणी टंचाईचा आराखडा त्वरीत पाठविण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन वारंवार लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच सदर बाबीची संवेदनशीलता लक्षात घेऊन यापुढे असा विलंब झाल्यास सक्त कारवाई का करण्यात येऊ नये, अशा प्रकारच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी दि.२६ जानेवारी २०१६ रोजी संयुक्त बैठक घेऊन तालुकास्तरीय अधिकारी/ कर्मचारी यांना दिल्या होत्या याबाबत यापुढे दक्षता घेण्यात येत आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी कळविले आहे.

जिल्हयाचा माहे जानेवारी, २०१६ ते मार्च, २०१६ व एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ या दोन टप्प्यांचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**उर्से (ता.मावळ, जि.पुणे) गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी नापिक झाल्याबाबत**

**(३२) * १५१०३ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्से (ता.मावळ, जि.पुणे) या गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत महिंद्रा हिनोमय इंडिया लि. या कंपनीने शेतकऱ्यांची वा शासनाची कोणतीही परवानगी न घेता गेल्या ५ वर्षांपासून वेस्ट मटेरियल टाकत असल्याने संपूर्ण शेती नापिक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या प्रकरणी उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे गेले वर्षभर तक्रारी करून सुद्धा सदर कंपनीवर कारवाई केली नाही, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुषंगाने कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) सदर कारखान्यास दिनांक ०६.११.२०१५ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत निर्देश देण्यांत आले व काळी माती टाकण्यास बंदी करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ रोजी वैयक्तिक सुनावणी घेऊन कंपनीतुन निर्माण होणारी विनाघातक काळी रेती व घनकचरा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने अधिकृत केलेल्या व्यवसायिकांनाच देण्यात यावे असे निर्देश दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कंपनीला देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सद्य:स्थितीत या उद्योगामार्फत विनाघातक काळी रेती ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने अधिकृत केलेल्या मे. सह्याद्री एन्टरप्राईझेस, मौजे इंदुरी, ता.मावळ, जि.पुणे या व्यवसायिकाला शास्त्रोक्त पध्दतीने भुभराव करण्यासाठी देण्यात येत आहे.

मे.महिंद्रा हिनोमय इंडिया लि. ही कंपनी वेस्ट मटेरियल शेतजमिनीत टाकत असल्याबाबत शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसल्याने चौकशी करण्यांत आली नाही असे तालुका कृषी अधिकारी, वडगांव मावळ, जि. पुणे यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोकणात पर्यटन विकासासाठी सी.आर.झेडचे बंधन शिथिल करण्याबाबत**

**(३३) * १४८९८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११७१५ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात पर्यटन विकासासाठी सी आर झेड नोटीफिकेशन २०११ मधील बाबींचा महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी समितीची बैठक दिनांक ८ जुलै, २०१४ रोजी कोणाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली,

(२) असल्यास, सदर आढावा समितीमध्ये किती सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे,

(३) दिनांक ८ जुलै, २०१४ रोजी झालेल्या आढावा समितीच्या बैठकीचा अहवाल किती दिवसात प्राप्त होईल ?

**श्री. रामदास कदम :** (१) सदर बैठक सचिव, पृथ्वी विज्ञान मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

(२) असल्यास, सदर आढावा समितीमध्ये सहा सदस्यांचा समावेश आहे.

(३) या आढावा समितीने तिचा अहवाल केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर केला आहे. सदर अहवाल केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे विचाराधीन आहे.

-----------------

**नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतील पाणी पुरवठा योजना निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३४) * १५०७३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत धावरी खुर्द नार्वत, मोघाळी, पाळज, सोमठाणा, तांडा, सावरगाव, हिप्परगा, बेरळी, सायाळ, धानोरा, शिकारा येथील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी वर्षभराच्या काळात १४० कामांना मंजूरी देण्यात आली होती पण त्यातील ७१ कामे अपुर्ण असल्याची बाब माहे डिसेंबर-२०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांना गेल्या ८ महिन्यांपासून निधी मिळाला नसल्याने योजनांची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत  शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नांदेड जिल्ह्यात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत धावरी खुर्द नार्वत, मोघाळी, पाळज, सोमठाणा, तांडा, सावरगाव, हिप्परगा, बेरळी, सायाळ, धानोरा, शिकारा येथील गावांच्या योजनांसह १४० योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यापैकी ८५ योजनांचे उद्दिष्ट डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आले असून उर्वरित ५५ योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.

(२) हे खरे नाही. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्ह्यात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात डिसेंबर अखेर रु.३७.३९४३ कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार निधीचे वाटप करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृष्णा नदीच्या शुध्दीकरणासाठी प्रदुषण नियमन मंडळाने राज्यस्तरीय समिती नेमल्याबाबत

**(३५) * १६१०३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा नदीच्या शुध्दीकरणासाठी प्रदुषण नियमन मंडळाने आराखडा तयार करण्यासाठी राज्यस्तरीय समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखडयात कोल्हापूर पंचगंगा नदीचा समावेश करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने पंचगंगा नदीसाठी आराखड्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे,

(४) असल्यास, आराखडा अंमलबजावणीसाठी शासनाने किती निधी मंजूर केला आहे,

(५) असल्यास, आराखडा अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे,

तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनान्वये, मित्रा (MEETRA) या संस्थेची कृष्णा नदीच्या खो-याचा सर्वसमावेशक अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी नेमणूक केली होती.

सदर अहवालाचे मुल्यमापन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या स्तरावर दि. ०४/१२/२०१५ रोजी आय.आय.टी/निरी या संस्थेच्या तंज्ञांचा समावेश असणारी समिती गठीत केली आहे.

(२) होय.

(३) पंचगंगा नदीसंदर्भात मूल्यमापन करण्याचे काम समितीमार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०४/१२/२०१५ रोजी अहवालाचे मूल्यमापन करण्यासाठी समिती गठीत केली. त्यामध्ये मुख्यत्वे छोटया व मोठया प्रदूषण करणाऱ्या घटकाची वर्गवारी करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना तंत्रज्ञान विषयक सल्ला देणे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे आराखडे बनवून घेणे या कामाचा समावेश आहे. यामध्ये निधीविषयक बाबींचा समावेश नाही.

(५) सदरील समितीची कार्यकक्षा मूल्यांकन करण्याची आहे.

-----------------

**राज्यातील काही भागांतील शाळांमध्ये शिक्षक कामावर येताना**
**वा वर्गात अध्यापन करतांना नशापान करत असल्याबाबत**

**(३६) * १५५५३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात काही भागांतील शाळांमध्ये शिक्षक कामावर येताना व वर्गात अध्यापन करतांना नशापान करतात अशी तक्रार ओरिएंटल ह्यूमन टाईटस प्रोटेक्शन फोरम ठाणे या संस्थेने पाहणी अहवाल तयार करुन शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालाची गंभीर दखल घेवून त्यातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदर संस्थेचे दिनांक १८/१२/२०१५ चे निवेदन जानेवारी, २०१६ मध्ये शासनास प्राप्त झाले आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित प्राधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या पाणीपट्टी थकबाकीमध्ये सूट देण्याबाबत**

**(३७) * १५८२३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायत देलवाडी, दहीसरतर्फे तारापूर, दाभाडी, वावे, कुडण, मोगरबाब, केतखडी, धिवली या ग्रामपंचायतीची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करावयाची पाणीपट्टी थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतींच्या थकबाकीमध्ये प्रचंड प्रमाणात व्याज आकारणी झालेली आहे व ती ग्रामपंचायतीच्या आवाक्या बाहेर असल्याने ग्रामपंचायतीने वाढीव व्याज न आकारता मूळ रक्कम आकारण्यात यावी, अशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या थकबाकीमध्ये सूट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) तारापूर अणूशक्ती केंद्र १ व २ पाणी पुरवठा योजनेतून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पालघर तालुक्यातील देलवाडी, दहीसरतर्फे तारापूर, दाभाडी, वावे, कुडाण,मोगरबाब, केतखडी,धिवली या गावांना ठोक स्वरुपात पाणी पुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे पुरविण्यात आलेल्या पाण्याची पाणीपट्टी ग्रामपंचायतीने अल्प प्रमाणात भरणा केली

असल्याने पाणीपट्टीची थकबाकी वाढलेली आहे. सद्य:स्थितीत मूळ पाणी पट्टी रुपये २.६० कोटी व विलंब आकार रुपये ४.४५ कोटी इतका आहे. पाणी पट्टीवरील विलंब आकार माफ करणे बाबतच्या निर्भय योजनेचा लाभ वारंवार कळवूनही या ग्रामपंचायतींनी घेतलेला नाही.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शाळा व महाविद्यालयातील वसतिगृहात अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३८) * १४८०४ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नामांकित शाळा व महाविद्यालयातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थांना अस्वच्छ स्वयंपाकगृहात शिजविलेले अन्न खाऊनच गुजराण करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका पोहचविणा-या शाळा व महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे अन्न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत**

**(३९) * १५५६४ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, प्रश्न इ.प्रलंबित मागण्यांवर तात्काळ निर्णय घेण्याबाबत एका राजकीय विद्यार्थी संघटनेमार्फत माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेच्या समस्या प्रश्न व प्रलंबित मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) या विभागाशी संबंधित मागण्याबाबत उचित कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) येथील ग्रंथालयाला अनुदान देण्याबाबत**

**(४०) * १६०३० श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथे ग्रंथालय उघडण्यात आले आहे तथापि पुरेसा निधी नसल्याने सदर ग्रंथालयाचे विद्युत बिल व अन्य खर्चासाठी कर्मचाऱ्यांना स्वत:चे पैसे खर्च करावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रंथालयास पुरेसा निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१५ मध्ये शासनाकडून बीडीएसवर एकूण अर्थसंकल्पीय रकमेच्या ७०% निधी वितरीत करण्यात आला होता. त्यानुसार निधीचे वाटप करण्यात आले होते. उद्दीष्ट शीर्षावर तांत्रिक अडचणीमुळे बीडीएस प्रणालीवरील निधी काढता आला नाही. त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने संबंधित अधिकारी यांनी वीज देयक व दूरध्वनी देयक रोखीने अदा केलेली आहेत.

(२) शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१५, निधी वितरण अन्वये अतिरिक्त २०% निधी बीडीएसवर उपलब्ध करून दिल्यामुळे सदर ग्रंथालयास पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे पुसेगाव (ता.खटाव, जि.सातारा) येथे बेकायदेशीर रास्त भाव दुकान सुरु असल्याबाबत**

**(४१) * १६०४२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुसेगाव (ता.खटाव, जि.सातारा) येथे गेल्या १८ वर्षांपासून बेकायदेशीर रास्त भाव दुकान सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुकानदारास शासनाकडून धान्य पुरवठा करण्यात येत होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, धान्य पुरवठा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय.

(३) मौजे पुसेगांव येथील रास्त भाव दुकान बेकायदेशिररित्या श्री.शरद साळुंखे यांनी चालविल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्याचेविरुध्द फौजदारी कलम १५४ अन्वये एफ.आय.आर. नं ६ दिनांक १६ जानेवारी, २०१६ अन्वये पोलीस स्टेशन पुसेगांव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) व (५) सन १९९८ ते २०१३ या कालावधीत तहसिल कार्यालय, खटाव येथे कार्यरत असलेल्या संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**जळगांव जिल्हयातील बेकायदा शिक्षक भरतीबाबत**

**(४२) * १५०८० श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ११८६९ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक २ मे, २०१२ पासून शिक्षक भरती बंद केल्याचे आदेश देऊनही जळगांव जिल्हयासह राज्यात बोगस शिक्षक भरती झाले व त्यास स्थानिक जिल्हा शिक्षणाधिका-यांनी मान्यता दिल्यामुळे आधीच अतिरिक्त शिक्षक असताना शासनाच्या तिजोरीवर मोठा भार पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत दिनांक २७.१०.२०१५ च्या पत्रान्वये वैयक्तिक मान्यता प्रकरणांमध्ये झालेली अनियमितता याबाबत चौकशी सुरू असून मुळ नस्ती व संचिका तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शिक्षण समृध्दी योजना लागू करुन शिक्षण प्रेरकांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत

**(४३) * १५४४८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण समृध्दी योजना लागू करुन अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या सर्व प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी हजारो शिक्षक प्रेरक दिनांक १२ जानेवारी, २०१६ पासून मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षण प्रेरकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रेरकाने आपला नेहमीचा व्यवसाय करुन किंवा छंद जोपासून समाजसेवेचे कार्य निस्वार्थी वृत्तीने, स्वेछेने व मोकळ्या वेळेत करावयाचे आहे. प्रेरकाला या स्वयंसेवेबाबत कायमस्वरुपी आपला हक्क सांगता येणार नाही. प्रौढ साक्षरता सारख्या केंद्र पुरस्कृत योजना केंद्राकडून काही उद्देशाने व ठराविक कालावधीसाठी सुरु केलेल्या असतात. त्यात वारंवार बदल होत असतात. त्यामुळे प्रेरक संघटनेच्या मागण्या मान्य करता येणार नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कासेगाव, खर्डी, भाळवणी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) याठिकाणी जीवन प्राधिकरणाच्या योजना सुरु करण्याबाबत

**(४४) * १५४१९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासेगाव, खर्डी, भाळवणी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) याठिकाणी जीवन प्राधिकरणाच्या योजना सुरु करण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून मागील दोन महिन्यापूर्वी विजेची थकबाकी भरुनही योजना सुरु होत नसल्याने या योजनांचे पाणी घेणाऱ्या २६ गावांतून तीव्र संताप व्यक्त होत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विजेची थकबाकी भरुनही अद्यापपर्यंत जीवन प्राधिकरण योजना सुरु न करणाऱ्या संबंधितांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली व सदर योजना त्वरीत सुरू करण्याबाबत काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) कासेगाव, खर्डी व भाळवणी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांचे थकित वीज देयक जिल्हा परिषद, सोलापूर यांचेमार्फत महावितरणकडे अदा करण्यात आले आहे. सदर योजनांपैकी कासेगाव व भाळवणी नळ पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती करून पाणीपुरवठा सुरु करण्यात येत आहे. तर खर्डी प्रादेशिक योजनेचा उद्‌भव कोरडा असल्याने सदर योजनेची दुरुस्ती करता येत नाही.

(२) व (३) कासेगांव व १२ गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची वीज जोडणी करून सद्य:स्थितीत योजनेतील ५ गावांना पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेली आहे तर उर्वरित ७ गावांना मार्च, २०१६ अखेर पाणीपुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे.

भाळवणी व ३ गावे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची आवश्यक ती दुरुस्ती करून योजनेतील समाविष्ट गावांना दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ पासून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

खर्डी व १० गांवे प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची वीज थकबाकी महावितरणकडे अदा केली आहे. तथापि, सोनके तलावात (उद्‌भवास) पाणी नसलेने वीज जोडणी घेतलेली नाही. उद्‌भवास पाणी उपलब्ध झाल्यास दुरुस्तीची कामे करून पाणीपुरवठा सुरु करणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्‌यापीठात सेवानिवृत्त सहायक कुलसचिवांना विद्‌यापीठाने दिलेले निवासस्थान रिक्त करण्याबाबत**

**(४५) * १५१९५ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्‌यापीठात सहायक कुलसचिव पदावरुन बडतर्फ झालेले व दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ रोजी सेवानिवृत्त झालेले कर्मचारी अजूनही विद्‌यापीठाने दिलेल्या शासकीय निवासस्थानात रहात असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सेवानिवृत्त सहायक कुलसचिवांनी विद्‌यापीठाने दिलेले शासकीय निवासस्थान (quarter) रिक्त करावे या संदर्भात प्रशासनिक स्तरावरुन किती वेळा पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने निवासस्थान करण्याबाबत व घरभाडे दंडासहित वसूल करुन फौजदारी कारवाई करण्याबाबत तसेच याप्रकरणी दिरंगाई केलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) यासंदर्भात त्यांच्याशी ४ वेळा पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(३) प्रकरण विद्‌यापीठ न्यायाधीकरणाकडे न्यायप्रविष्ठ आहे.
(४) सदर प्रकरण विद्‌यापीठ न्यायाधिकरणाकडे न्यायप्रविष्ठ असल्याने यासंदर्भात अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने त्यांच्याकडून व्यावसायिक दराने भाडे वसूली करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------------------

**नागपूर येथे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत दोन**
**कुस्तीगारांनी उत्तेजकांची इंजेक्शन घेतल्याबाबत**

**(४६) * १५३३२ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे मानाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी दोन कुस्तीगारांना उत्तेजकांची इंजेक्शन घेतांना रंगेहाथ पकडण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कुस्तीगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद यांच्यावतीने ५९ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०१५-१६ दिनांक ६ ते १० जानेवारी, २०१६ या कालावधीमध्ये नागपूर येथे पार पडली. सदर स्पर्धेमध्ये कुस्तीगिरांनी उत्तेजक इंजेक्शन घेण्याबाबत कोणताही प्रकार घडला नसल्याचे परिषदेच्या दिनांक ०१.०३.२०१६ रोजीच्या अहवालावरून आढळून येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील शालेय विद्याथ्यांची आधार कार्ड नोंदणी करणेबाबत**

**(४७) * १४६१३ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शालेय विद्यार्थ्यांना आधार नोंदणी करणे आवश्यक केले असतांना यवतमाळ जिल्हा मात्र यात मागे असल्याचे निदर्शनास येत असून राज्यात यवतमाळ जिल्हयाचा आधार नोंदणीत २९ वा क्रमांक असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिसेंबर महिन्यापर्यंत जिल्ह्यातील ५ ते १८ वयोगटातील ६७ हजार विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नोंदणी करण्यात आली असून एकूण लोकसंख्येपैकी ८५ % नागरिकांचे आधार कार्ड काढण्यात आले असून विद्यार्थ्यांचे मात्र आधारकार्ड काढण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त विद्यार्थ्यांची आधार नोंदणी त्वरित करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) विद्यार्थ्यांच्या १००% आधार नोंदणी करण्याकरिता विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

-----------------

## मौजे सस्ती (ता.बाळापूर, जि.अकोला) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४८) * १६५८४ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सस्ती (ता.बाळापूर, जि.अकोला) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत मंजूर पाणी पुरवठा योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार गावकऱ्यांनी शासनाकडे नुकतीच केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या योजनेत ४.२० लक्ष रुपये निधीचा गैरव्यवहार झालेला असल्यामुळे या गावाला पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी वापरण्यात आलेले साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे तसेच पाण्याच्या टाकीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे या संपुर्ण योजनेची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशतः खरे आहे. मौजे सस्ती (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे रु. ४,४०,०७९/- इतक्या एकूण रकमेचे साहित्य गहाळ

झाल्यामुळे, तत्कालिन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर यांनी पोलीस स्टेशन, चान्नी, ता.पातूर येथे ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांचेविरुध्द दिनांक २७/७/२०१२ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

तथापि, सदर योजनेसाठी साहित्य खरेदी करताना घेतलेल्या गुणवत्ता चाचणी अहवालानुसार साहित्याचा दर्जा समाधानकारक असून समितीने केलेल्या कामाचा दर्जा समाधानकारक असल्याचे उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद बाळापूर यांनी प्रमाणित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात १८४ रास्त भाव दुकानात अन्न, धान्याचा तुटवडा झाल्याबाबत

**(४९) * १६७०३ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १८४ रास्त भाव दुकानात तांदूळ व गहू या प्रमुख अन्नधान्याचा मागील ३ महिन्यांपासून अचानक कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्यामुळे तालुक्यातील बीपीएल शिधापत्रिकाधारकांची व अंतोदय व अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांची मोठी गैरसोय झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे १२ हजार क्विंटल धान्यांच्या कृत्रिम तुटवडा व ते अचानक गायब होण्यामागे काळा बाजारातील धान्य तस्करांचे कारस्थान असावे की काय अशा शंका ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) भारतीय अन्न महामंडळाकडे अन्नधान्याचा पुरेसा साठा नसल्याने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये अन्नधान्याची उचल कमी झाली आहे. परंतू सर्व लाभार्थ्यांना उपलब्ध अन्नधान्याच्या प्रमाणात अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील टँकर गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(५०) * १७४३६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हयातील टँकर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीचा अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीचे निष्कर्ष आणि जबाबदार अधिकारी यांचा तपशिल माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये जिल्हाधिकारी, बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना कार्यवाहीस्तव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील दोषीविरुध्द शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कंत्राटदारास अदा करण्यात आलेली बोगस देयके आणि इतर रक्कमा वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी कळविल्यानुसार प्राप्त चौकशी अहवालातील निष्कर्षामध्ये नमूद संबंधित अधिकारी यांना जिल्हा परिषद कार्यालयाचे स्तरावरुन अनियमिततेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देखील संबंधित तत्कालीन तहसिलदार यांना अनियमिततेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

(५) सन २०१५-१६ मध्ये कंत्राटदारास अदा करण्यात आलेल्या देयकाची तपासणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कार्यालयातील अंतर्गत लेखा परिक्षण

अधिकाऱ्यांकडून करुन घेऊन त्यांचेकडून येणा-या अहवालानुसार वसुलपात्र रक्कम कंत्राटदाराच्या देय असलेल्या देयकामधून वसूल करुन घेण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार दोषी आढळणा-यांवर उचित कारवाई करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विनाअनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना वेतन देण्याबाबत**

**(५१) * १७४५२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विनाअनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक १० ते १५ वर्षे पगारापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकांचे थकीत असणारे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) अनुदानास पात्र घोषित शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान अदा केले जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औषध विक्रीच्या दुकानाच्या परवानगीस शुल्कवाढ कमी करण्याबाबत**

**(५२) * १७६१९ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने औषध विक्रीच्या दुकानाचे परवानगी शुल्क रु. ३०००/- वरुन रु. ३०,०००/- पर्यंत वाढविण्याचे निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शुल्क वाढीला राज्यातील औषध विक्री दुकानदारांच्या संघटनेने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शुल्क वाढ कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

तथापि, केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालयाने अधिसूचना क्र.G.S.R.१०११ (E) दिनांक २९/१२/२०१५ अन्वये औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत औषधे व सौंदर्य (८th Amendment) नियम, २०१५ शुल्क वाढीबाबत प्रारुप नियम प्रसिध्द केलेले आहेत. त्यामध्ये औषध विक्रीसाठी लागणाऱ्या विविध परवान्यांच्या शुल्कामध्ये वाढ प्रस्तावित केली आहे. तथापि, अंतिम शुल्कवाढ अद्याप निश्चित केलेली नाही.

(२) अशा स्वरुपाचे निवेदन सचिव, नागपूर डिस्ट्रीक्ट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्याकडून प्राप्त झाले आहे.

(३) सदर बाब केंद्र शासनाच्या अख्यत्यारीतील असल्यामुळे केंद्र शासनाकडून सदर अधिसूचनेद्वारे इच्छुक व्यक्तींकडून आक्षेप/अभिप्राय मागविण्यात आले आहेत. त्यानंतर अंतिम नियम केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैद्यकीय संशोधनासाठी केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास विभागाने संशोधनात रस दाखविला नसल्याबाबत**

**(५३) * १७८३९ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित १५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये असून वैद्यकीय संशोधनासाठी केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास विभागाने प्रती महाविद्यालय ३० लाख रुपयांचे आर्थिक सहाय उपलब्ध करुन दिल्यानंतरही गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यातील एकाही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने संशोधनासाठी प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाने वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या अध्यापकांना संशोधनपर कार्याकरिता प्रशिक्षण देण्यासाठी विविध ७ योजनांची शिफारस केली असून सदर योजनांमध्ये प्रशिक्षणपर कार्यासाठी रु.३० लाखांचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर योजनेमध्ये सहभागी होण्याची अंतिम तारीख संकेत स्थळावर नमूद करण्यात आलेली नाही. त्यानुषंगाने राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांना इच्छुक प्राध्यापकांचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याच्या सुचना वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाच्या स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हयातील विद्यार्थी व शिक्षक यांची माहिती**
**सरळ वेबसाईटवर ऑनलाईन भरली जात असल्याबाबत**

**(५४) * १८३७० श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील विद्यार्थी व शिक्षक यांची माहिती सरळ वेबसाईटवर ऑनलाईन भरली जात आहे. शासनाच्या या चांगल्या उपक्रमात मात्र विद्यार्थ्यांकडून, शाळांकडून १० ते १२० रुपये उकळले जात असल्याने पालक वर्गातून रोष व्यक्त केला जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमबाह्यपणे पैसे वसूल करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग तालुक्यातील सागरी नियमन क्षेत्र (सीआरझेड) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(५५) * १८४७९ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी नियमन क्षेत्र (सी.आर.झेड) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश मा.पर्यावरण मंत्री यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील १४५ व मुरुड तालुक्यातील १४१ यापैकी सी.आर.झेड चे उल्लंघन करणाऱ्या फक्त १५६ बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची कारवाई करताना नवीन सर्व्हेक्षण करुन कारवाई करणे अपेक्षित असताना सन २०१०-११ मधील यादीच प्रसिध्द करुन त्याआधारे कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१०-११ नंतरच्या अनधिकृत बांधकामांना अभय देण्यासाठीच संबंधित अधिकाऱ्यांनी या बांधकामधारकांशी संगनमत करुन जुनीच यादी प्रसिध्द केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सुरु असलेली कारवाई बंद करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, नवीन सर्वेक्षणानुसार पुन्हा नव्याने कारवाई सुरु करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा येत आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) सदर १५६ अनधिकृत बांधकाम प्रकरणी संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करण्यांत आले आहेत.

महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३,५४ व ५५ अन्वये उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेमार्फत नोटीसा बजावण्यांत आल्या असून ज्या प्रकरणांत मा. न्यायालयाकडून जैसे थे आदेश प्राप्त झालेले नाहीत अशा प्रकरणांत महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अंतर्गत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) अलिबाग तालुक्यात नव्याने आढळलेल्या १२ अनधिकृत बांधकामधारकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यांत आले असून मुरुड तालुक्यातील नवीन सर्व्हेक्षणानुसार १९ बाहेरील व ७ स्थानिक असे एकूण २६ अनधिकृत बांधकामधारक आढळले आहेत. त्यापैकी ०८ बाहेरील बांधकाम प्रकरणी मा. न्यायालयाकडून जैसे थे आदेश मिळाले असून उर्वरित अनधिकृत बांधकामधारकांवर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(५६) * १८५०४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील १८७ पाणीपुरवठा योजनेतील २४ पाणीपुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आर्थिक गुन्हे शाखा ठाणे यांच्याकडे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्हाचा तपास पूर्ण झाला आहे काय, तसेच या प्रकरणात दोषी आढळलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

मुरबाड तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत असलेल्या २३ पाणीपुरवठा योजनांमध्ये आर्थिक गैरव्यवहार असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी व तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर, मार्च, २०११ ते आजपर्यंत टप्याटप्याने टोकावडे पोलीस स्टेशन व मुरबाड पोलीस स्टेशन मध्ये फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

यापैकी १४ योजनासंदर्भात गुन्हा दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी टोकावडे पोलीस स्टेशन मध्ये नोंदविण्यात आला आहे.

(२) होय, दिनांक २२ डिसेंबर २०१५ रोजी टोकावडे पोलीस स्टेशन अंतर्गत नोंदविण्यात आलेल्या १४ योजनांवरील गुन्हे, सदर पोलीस स्टेशन मार्फत आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहेत.

(३) मुरबाड तालुक्यामधील एकुण २३ योजनांबाबत नोंदविण्यात आलेल्या गुन्हयांचे तपासाचे काम टोकावडे मुरबाड पोलीस स्टेशन व आर्थिक गुन्हे शाखेमार्फत अद्याप सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांबाबत**

**(५७) * १५८८१ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांनी आपल्या प्रलंबित मागण्याच्या संदर्भात पंचायत समिती कार्यालयासमोर माहे जानेवारी, २०१६ मध्ये उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांचे कोणकोणते विषय निर्णयासाठी प्रलंबित आहेत,

(३) संबंधित शिक्षकांच्या आंदोलनाची दखल घेऊन काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) सेवानिवृत्त होईपर्यंत व सेवानिवृत्त झाल्यानंतरही शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली आहे,

(६) नसल्यास, सेवानिवृत्त शिक्षकांना वेठीस धरणाऱ्या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महिन्याच्या १ तारखेला निवृत्ती वेतन बँक खात्यात जमा करणे, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणीनुसार आर्थिक लाभ अदा करणे व स्वग्राम प्रवास भत्ता अदा करणे इ. विषय कार्यवाहीसाठी आहेत.

(३) सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे मागणीनुसार पडताळणी करुन प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात केशरी रेशनकार्डाची उत्पन्न मर्यादा २ लाख करण्याबाबत**

**(५८) * १४९६३ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केशरी रेशनकार्डाची उत्पन्न कमाल मर्यादा गेली वीस वर्षे रुपये १ लाख वार्षिक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याचा महागाईचा चढता आलेख पाहता ही उत्पन्न मर्यादा रुपये २ लाख करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ पासून केशरी रेशनकार्डाची कुटुंब उत्पन्नमर्यादा रु. एक लाख आहे.

(२) सद्य:स्थितीत सदरहू शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या उत्पन्नाच्या निकषांमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शालेय शिक्षण दर्जा सुधारण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, कलाचाचणी, समुदेशन कार्यक्रम राबविण्याबाबत**

**(५९) * १६२३५ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण दर्जा सुधारण्यासाठी राज्य शिक्षण विभागाकडून सध्या राबविण्यात येत असलेल्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, कलाचाचणी, समुपदेशन इ.कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारच्या खासगी व शिक्षण क्षेत्राशी संबंध नसलेल्या अनेक संस्थांना कामे दिली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागातील अनेक मंडळे, कार्यालयांमध्ये खासगी संस्थांच्या प्रतिनिधींचा शासकीय कामकाजात हस्तक्षेप वाढला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कार्यक्रमात ज्या खासगी संस्थाच्या शैक्षणिक क्षेत्राशी संबंध आहे त्यांनाच कामे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) ज्या स्वंयमसेवी संस्था (NGOS) शैक्षणिक क्षेत्रांशी संबंध आहेत. त्यांनीच स्वेच्छेने शासकीय कामात योगदान दिलेले आहे. तसेच कलमापन चाचणी, समुपदेशन या कामी ज्या स्वंयमसेवी संस्था (NGO'S) ने सहकार्य केले त्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहकार्य शासन स्तरावरुन देण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षकांकडून लाखो रुपयांची लाच घेतल्याबाबत

**(६०) * १५१६४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील प्रभारी शिक्षणाधिकारी श्री.सरगर यांनी शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता देताना सुमारे चार वर्षापासून प्रलंबित असलेल्या मान्यता देताना संबंधित शिक्षकांकडून लाखो रुपयांची लाच घेवून शिक्षकांची आर्थिक पिळवणूक केली असल्याचे दिनांक १९ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने संबधित शिक्षकांची आर्थिक पिळवणूक करणा-या अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दि. १८.१.२०१६ रोजी जिल्हा परिषद सोलापूर च्या सर्व साधारण सभेत जिल्हा परिषद सदस्यानी श्री. व्ही. आर. सरगर, तत्कालिन प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्य.) हे शिक्षकाच्या वैयक्तिक मान्यतेसाठी पैशाची मागणी करीत असल्याबाबत ऑडीयो ध्वनिफित ऐकविली असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी त्यांच्या दि. १.२.२०१६ च्या पत्रान्वये आयुक्त शिक्षण यांना कळविले आहे.

(२) या प्रकरणी आयुक्त शिक्षण कार्यालयाने वरिष्ठ अधिकाऱ्यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करुन तपशिलवार चौकशी करण्याचे आदेश दिले आहे.
(३) आयुक्त शिक्षण कार्यालयाने संबंधित अधिकारी यांना दिनांक ९.२.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमधील शिक्षकांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्याबाबत

**(६१) * १५१४७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुदानित शाळांमध्ये नेमणुका झालेले तसेच विनाअनुदानित/अशंत अनुदानित/कायम विनाअनुदानित शाळांमध्ये नेमणुका होऊन नंतर अनुदानावर आलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कायदेशीर पेन्शन मिळण्याबाबत शासनाने न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे आणि शासनाचे उदासिन धोरण यामुळे प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) न्यायालयीन प्रकरणी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांनी व शाळा संचालकांनी संगनमताने गैरव्यवहार करुन शिक्षकांच्या नियुक्त्या केल्याबाबत

**(६२) * १५२७२ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल तटकरे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक ११०७७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये दिनांक २ मे, २०१२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यास बंदी असतांना अनेक ठिकाणच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी व शाळा संचालकांनी संगनमताने गैरव्यवहार करुन त्या नियुक्त्यांना मान्यता प्रदान करण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैयक्तिक मान्यता दिलेल्या प्रकरणांची संपूर्ण माहिती आयुक्त, शिक्षण पुणे यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१५ च्या पत्रानुसार राज्यातील सर्व वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून मागविली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण गैरव्यवहारांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच, या गैरप्रकारामुळे शासनाने वेतनापोटी अदा केलेले करोडो रुपये वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) राज्यात भरती बंदी कालावधीत वैयक्तिक मान्यता प्रदान केल्यामुळे झालेल्या आर्थिक व प्रशासकीय अनियमिततेबाबत आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत दि.२७.१०.२०१५ च्या पत्रान्वये कार्यवाही सरु असून याप्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळेतील शिक्षकांना नियमानुसार मान्यता मिळण्याबाबत

**(६३) * १५९०७ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांमध्ये मे, २०१२ नंतर शिक्षकांच्या रिक्त पदावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये व विद्यार्थ्यांना शिक्षक द्यावेत या पालकांच्या मागणीमुळे शाळा व्यवस्थापनांनी नियमानुसार व आरक्षणानुसार नियुक्ती केलेल्या शेकडो शिक्षकांना वेळोवेळी मागणी करुनही शिक्षणाधिकाऱ्यांनी अद्याप मान्यता न दिल्याने शिक्षकांना विनावेतन काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या हितासाठी माहे मार्च, २०१५ पर्यंत नियमाप्रमाणे नियुक्ती केलेल्या शिक्षकांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) दि. २ मे, २०१२ नंतर पदभरती बंदी असताना विहित प्रक्रीयेशिवाय संस्थांनी परस्पर शिक्षकांच्या नेमणूका केलेल्या आहेत, अशा शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देता येणार नाही. तथापि शासन निर्णय २०.६.२०१४ नूसार विहित प्रक्रीया अवलंबून नियुक्त शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देता येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबेजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयातील बदली कामगारांना सेवेत कायमस्वरुपी समावून घेण्याबाबत

**(६४) * १४८६६ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १११७० ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबेजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात ३२ वर्षापासुन काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना शासनाने सेवेत नियमीत करण्यासाठी मा. न्यायालयाने निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजंदारी कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी २४० दिवसाची सेवा अट रद्द करण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, वन विभाग व औद्योगिक महामंडळाने त्यांच्या कंत्राटी/हंगामी कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी २४० दिवसाची अट रद्द केली त्यानुसार वैद्यकिय शिक्षण विभाग कार्यवाही करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हंगामी कामगारांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथील रोजंदारी/बदली कर्मचाऱ्यांनी मा. न्यायालयात विविध याचिका दाखल केल्या होत्या. सदर याचिकेत मा.न्यायालयाने रोजंदरी/ बदली कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी तयार करणेबाबत निर्देश दिले होते. तर काही याचिकेत ज्येष्ठता यादीत संबंधित अर्जदारांची नावे अंतर्भूत करण्याचे निर्देश दिले आहेत.

(२) व (३) शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरुपात काम करणाऱ्या कामगारांना नियमित करण्यासाठी किमान १० वर्षाची सेवा व एका वर्षामध्ये किमान २४० दिवस सेवा करणे आवश्यक आहे. एका वर्षात किमान २४० दिवसाची सेवा ही औद्योगिक कामगार कायदा १९४७ मध्ये अंतर्भूत आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे असलेल्या राष्ट्रीय फर्टिलायझर्स (आरसीएफ) प्रकल्पात अमोनिया वायुची झालेली गळती**

**(६५) * १४७१५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राजेंद्र जैन, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे असलेल्या राष्ट्रीय फर्टिलायझर्स (आरसीएफ) प्रकल्पात शनिवार दिनांक २ जानेवारी २०१६ रोजी वायुगळती होऊन एक कर्मचारी अत्यवस्थ झाला तर ग्रामस्थांना डोळे चुरचुरणे व श्वसनाचा त्रास झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात सदर कंपनीत वायुगळती होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) होय.

(३) सदर वायूगळती हा अपघात असून सदर अपघाताची औद्योगिक सुरक्षा व चौकशी आरोग्य संचालनालयामार्फत चालू आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उद्योगास समजपत्र देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**धुळे व नंदुरबार जिल्हयांना अन्न सुरक्षा योजनांचा लाभ देण्याबाबत**

**(६६) * १६११४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदूरबार जिल्हयात एपीएल शेतक-यांना अन्न सुरक्षा योजनेंतर्गत २ व ३ रुपये किलो दराने अन्नधान्य पुरविण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे व नंदुरबार हे आदिवासी जिल्हे असूनही या जिल्हयांना अन्न सुरक्षा योजनांचा लाभ देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हयांना त्वरीत अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) धुळे व नंदुरबार जिल्हयांमध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये अनुक्रमे १०,९९,९४२ व ६,६५,४३२ प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी सवलतीच्या दराने अन्न धान्याचा लाभ घेत असून त्यामध्ये एपीएल (केशरी) मधील शेतकऱ्यांचा देखील समावेश आहे. राज्यातील १४ जिल्हयांव्यतिरिक्त इतर जिल्हयांमधील अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्य देण्याची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्तीसाठी जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(६७) * १४६०६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १२६२० ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १० जुलै, २००१ च्या शासन निर्णयामध्ये परिशिष्ट अ.क्र.१ मध्ये वैद्यकीय देयकाच्या प्रतीपुर्तीसाठी ३ टक्के रक्कम शुल्क दर म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधिक्षक यांना देण्याच्या अटीतुन शासकीय कर्मचाऱ्यांना वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांकडून घेतली जाणारी ३ टक्के पडताळणी फी रद्द करण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतरांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी देयकांच्या रकमेच्या ३ टक्के रक्कम जी पडताळणी फी म्हणून घेण्यात येत आहे, ती शासकीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर रद्द करण्याच्या शासनाच्या विचाराधिन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(४) नसल्यास, उक्त विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय,

(२) नाही.

(३) याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कार्यवाही होणेसाठी त्यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) मुंबई व ठाण्यातील वीस अभियांत्रिकी महाविद्यालयांविरोधात करावयाची कारवाई

**(६८) * १४७४० श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती शोभाताई फडणवीस : तारांकित प्रश्न क्रमांक ११९३५ ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) सर्व पात्रता निष्कर्षाची पूर्तता केल्याचा खोटा दावा करणा-या मुंबई व ठाण्यातील वीस अभियांत्रिकी महाविद्यालयांविरोधात गेल्या नऊ महिन्यापासून कारवाई करण्यात एआयसीटीई कडून टाळाटाळ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपात्र अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कारवाई न करणा-या तसेच संगनमताने त्यांना प्रवेश क्षमता व अभ्यासक्रम वाढविण्यास मान्यता देणा-या संबंधित अधिका-यांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी शिक्षण क्षेत्रातील तज्ञांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्यानुसार अपात्र अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदर बाब अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या कार्यकक्षेतील आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) अपात्र अभियांत्रिकी महाविद्यालयाना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून मुदतवाढ देण्यात आली नाही. त्याविरोधात संबंधित संस्थांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित संस्थांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेत समावेश करण्यात आला होता.

चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिली यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात आले आहे. तसेच ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांकडे पायाभूत सुविधा, पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग व योग्य शैक्षणिक दर्जा राखला जात आहे किंवा नाही यांची काटेकोर तपासणी करून या अभियांत्रिकी महाविद्यालयांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्याचे निदेश सर्व संबंधित विद्यापीठांना देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विभाजन करुन नागपूर येथे स्वतंत्र आरोग्य विज्ञापीठ स्थापन करण्याबाबत

**(६९) * १६४२८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विभाजन करुन नागपूर येथे स्वतंत्र आरोग्य विद्यापीठ स्थापन करण्याचा शासनाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र विद्यापीठाची नागपूर येथे स्थापना करण्यासाठी शासनाने दिनांक ९ डिसेंबर २०१५ रोजी नागपूर येथे बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आयुर्वेद-युनानी व होमिओपॅथी करिता नागपूर येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी आरोग्य संचालनालयाने दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी जागेचा शोध घेण्यासाठी चार सदस्यांची समिती गठीत केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाचे विभाजन करुन नागपूर येथे स्वतंत्र आरोग्य विद्यापीठ स्थापन करण्याच्या निर्णयाला नाशिकमधील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनास निवेदन देऊन विरोध केला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नाशिक येथील विद्यापिठाला अधिक सक्षम करण्यासाठी निधी व पदे मंजूर करावीत अशी भूमिका येथील लोकप्रतिनिधींनी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे,

याबाबतचा मुद्दा विचाराधीन आहे.

(२) अंशत: खरे आहे,

संचालक आयुष यांच्यामार्फत बैठक घेतलेली आहे.

(३) होय,

(४) होय,

(५) होय,

(६) नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकरिता पदनिर्मितीची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने बॅचलर ऑफ व्होकेशनल अभ्यासक्रमाला मान्यता देऊनही काही महाविद्यालयांनी परिक्षा घेतल्या नसल्याबाबत**

**(७०) * १६१४१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्यावतीने देशातील सर्व विद्यापीठाना बॅचलर ऑफ व्होकेशनल हा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत राज्य शासनाला निर्देश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने बॅचलर ऑफ व्होकेशनल अभ्यासक्रमाला मान्यता देवून देखील गेल्या दीड वर्षापासून या अभ्यासक्रमाच्या परिक्षाच काही महाविद्यालयातून घेतल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या संदर्भात संबंधित महाविद्यालयाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साठे आर्टस् सायन्स व कॉमर्स महाविद्यालय (विलेपार्ले, मुंबई) येथे प्राचार्य पदावर अपात्र व्यक्तीची नियुक्ती केल्याबाबत**

**(७१) * १५२४२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या विलेपार्ले येथील साठे आर्टस् सायन्स व कॉमर्स महाविद्यालयात प्राचार्य पदावर अपात्र व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त व्यक्तीच्या एपीआय पॉईंटस् ची पुर्तता होत नसतानाही सदर निवड करण्यात आली असल्यामुळे त्यासंबंधीच्या निवड समितीच्या इतिवृत्तावर शासन प्रतिनिधीने स्वाक्षरी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अवैध नियुक्ती करिता कुलगुरु व प्र.कुलगुरु यांनी निर्देश दिल्याबाबत उपकुल सचिव यांनी इतिवृत्तात नमुद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अवैध निवडीबाबत मुप्ता संघटनेने तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशाप्रकारे मुंबई विद्यापीठांतर्गत अपात्र व्यक्तींची प्राचार्य पदी नियुक्ती केल्याची ३९ प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या अवैध नियुक्ती बाबतची तक्रार करुनही याबाबतीत कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) शासन प्रतिनिधीने स्वाक्षरी केलेली नाही, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देऊळगावराजा वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम**
**निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(७२) * १६१८७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुजल निर्मित अभियानाअंतर्गत देऊळगावराजा वाढीव पाणीपुरवठा योजनेस मंजूर झालेल्या निधीपैकी ६,४०,४१,०००/- एवढा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित कामाकरिता लागणारा शिल्लक निधी प्राप्त झाला नसल्यामुळे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उपयोगिता प्रमाणपत्र देण्यात आलेले असतानाही निधी प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शिराळा धरणातील पाणी १०० टक्के संपले असून सावखेड भोई धरणातील पाणी १०० टक्के संपले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उर्वरित निधी कधीपर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक २३/२/२०१६ च्या आदेशान्वये देऊळगांवराजा नगरपरिषदेस रु.३६५.६३ लाख अनुदान वितरीत करण्यात आले आहेत. मंजूर पाणी पुरवठा योजनेच्या १४ उपागांच्या कामांपैकी ५ उपांगाची कामे पूर्ण झाली आहेत व इतर उपागांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) होय.

(५) अनुज्ञेय शासकीय अनुदान रु.११८९.५५ लाख पैकी रु.१००६.०४ लाख इतके अनुदान देऊळगांवराजा नगरपरिषदेस वितरीत करण्यात आले आहे. सदर नागरी संस्थेने सवहिश्याची रक्कम भरल्यानंतर तसेच वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र व कामाच्या सद्यस्थितीबाबतची माहिती सादर केल्यानंतर उर्वरित अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपळगाव मोर (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे**
**पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत**

**(७३) * १५३९५ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव मोर (ता.इगतपुरी, जि.नाशिक) घोटी-सिन्नर-शिर्डी रस्त्यावर असलेल्या या गावासाठी सुमारे पन्नास लाख रुपये खर्च करूनही पाणी पुरवठा योजना कार्यान्वित न झाल्याने गावांना पावसाळ्यातही भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, सदर योजनेची चौकशी उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जिल्हा परिषद, मालेगाव यांच्यामार्फत करण्यात आली असून त्यांच्या दिनांक ४/७/२०१५ रोजीच्या अहवालानुसार पिंपळगाव मोर नळपाणी पुरवठा योजनेच्या कामात अनयिमितता झालेली नाही असे दिसून येते, असे नमूद केले आहे. तसेच सद्य:स्थितीत किरकोळ अडचणी वगळता गावास पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(३) समितीने पाणीपुरवठा सुरु केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बेकायदेशीररित्या मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रियेबाबत**

**(७४) * १४९७४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अकोला व अन्य जिल्ह्यामध्ये मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रिया बेकायदेशीररित्या केल्या जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय, असल्यास,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भारतीय संविधानाचे अनुच्छेद २५०, २५१ व २५२ नुसार केंद्र शासनाकडे अधिकार असल्याने राज्य शासन स्तरावर कारवाई करणे अडचणीचे ठरत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीररित्या मुत्रपिंडाचे रोपण शस्त्रक्रिया करणाऱ्या समाजकंटकाविरुध्द कारवाई करण्याच्यादृष्टीने अधिकार प्राप्त व्हावेत, याबाबत राज्यशासनामार्फत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात यावी, अशा आशयाची निवेदने राज्यातील सामाजिक संस्थांनी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे केली असल्याचे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुसार अकोला जिल्ह्यात मानवी मूत्रपिंड प्रतिरोपणाच्या शस्त्रक्रिया करण्यात येत नाहीत.

तथापि, पैशांची लालूच दाखवून, फसवणूक करुन, शस्त्रक्रियेद्वारे, अवैध रीतीने मूत्रपिंड काढून त्याचे प्रतिरोपण करण्यात आले, अशी एक फिर्याद पोलीस ठाणे, डबकी रोड, अकोला, येथे दिनांक ०२.१२.२०१५ रोजी तर दुसरी फिर्याद जुने शहर पोलीस ठाणे, अकोला, येथे दिनांक ०३.१२.२०१५ रोजी प्राप्त झाली.
या दोन्ही प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

(२) नाही.

मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, १९९४ च्या कलम १३ च्या पोटकलम (२) अन्वये राज्य शासनाने दिनांक २३.०३.१९९५ रोजीच्या शासकीय अधिसूचनेच्या द्वारे संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ समुचित प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम २२ च्या अनुसार समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या तक्रारीवरुन न्यायालय उक्त अधिनियमाखालील अपराधांची दखल घेऊ शकते.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शासनाच्या १४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अवयवदानासाठी स्वतंत्र पदे निर्माण करण्याबाबत**

**(७५) * १५६५५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात अवयवदान चळवळ रुजण्यासाठी शासनाच्या १४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र पदेच निर्माण करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रेन डेड रुग्णांच्या नातेवाईकांना अवयवदानासाठी प्रवृत्त करण्यासाठी ही पदे निर्माण होणे गरजेचे असताना शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ३० हजार किडनी रुग्णांना सव्वा लाख वेळा डायलिसिस करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवयव काढण्याची व्यवस्था अनेक रुग्णालयांत नसल्याने शासन व खाजगी यंत्रणेच्या कॅडेव्हर डोनेशनबाबतच्या उदासिनतेमुळे हजारो रुग्ण अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, १४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र पदे निर्माण करण्याबाबत तसेच रुग्णांना अवयव त्वरित मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अवयव दानासाठी आवश्यक तांत्रीक पदे निर्माण केली आहेत. परंतु जनजागृती व जनतेला अवयवदाना करिता प्रवृत्त करण्यासाठी आवश्यक असलेली समुपदेशकांची पदे निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे.

(३) याबाबतची आकडेवारी उपलब्ध नाही.

(४) रुग्ण, अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत ही बाब खरी आहे. परंतु अवयव दानाकरिता जनमत तयार होणे आवश्यक आहे.

(५) स्वतंत्र पद निर्मितीचे काम सुरु आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे अवयव दानाचे काम नियमित पणे होत आहे. राज्यातील सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयीन नॉन ऑर्गन ट्रान्सप्लांट रिट्रीव्हल सेंटरबाबत पंजीकरण आरोग्य खात्यामार्फत प्राप्त झाले असून पाच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये यांनी आरोग्य खात्याकडे पंजीकरणाकरिता अर्ज केलेला असून त्यांचे पंजीकरण आरोग्य खात्याकडे प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी धरण बांधणेबाबत

**(७६) * १६०४० श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी पाड्यांना पाणीपूरवठा करण्यासाठी धरण बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाचे नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, या धरणावर किती खर्च करण्यात येणार आहे व किती गावांना व पाड्यांना या धरणात पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. मात्र शहापूर तालुक्यतील टंचाईग्रस्त गावपाडयांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, तालुक्यातील जास्तीत जास्त पाडे समाविष्ट करुन योजना तयार करणे, प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील भावली धरण उद्‌भव निश्चित करुन ९७ गावे २५९ पाडयांसाठी गुरुत्वाकर्षणाद्वारे योजनेचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागारामार्फत योजनेचे सर्वेक्षण करण्यात आले असुन योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. सदर योजनेस प्रथमत: आवश्यक त्या परवानग्या व पाणी आरक्षण प्राप्त करुन घेण्याबाबत जिल्हा परिषदेस निर्देस देण्यात आले आहेत. सदर परवानग्या व पाणी आरक्षण प्राप्त झाल्यानंतर योजनेस मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालयाला संचालक नसल्याबाबत

**(७७) * १७४७५ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालयाला गेल्या अडीच ते तीन वर्षापासून संचालक नसल्याची बाब दि. २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षापूर्वी पूर्णवेळ संचालक नेमण्याची घोषणा सांस्कृतिक मंत्र्यांनी करुनही अद्यापी संचालक नेमण्यात न येणे, तसेच गेल्या १८ वर्षात एकही पुरातत्ववेत्ता या पदावर नेमण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील एकूण ३७१ संरक्षित वास्तूंच्या, संरक्षण संवर्धनाची जबाबदारी असणाऱ्या या संचालनालयासाठी ३०० कर्मचाऱ्यांची तरतूद असून, त्यापैकी ९४ पदे रिक्त व ७९ पदांचे काम बाहेरुन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच रायगड महोत्सवाकरीता शासनाने कोट्यावधी रुपयांचा खर्च केला, परंतु गड संवर्धन योजने अंतर्गत चालु वर्षात पूर्ण करावयाच्या १२ कोटी ७० लाख रुपयांच्या कामांना अद्याप सुरुवातही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गड संवर्धनाच्या कामाकरीता जाहीर झालेल्या ६१ कोटी रुपयांपैकी या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात किती कोटी रुपये खर्च करण्यात आले,

(६) असल्यास, गड संवर्धनाच्या कामास सुरुवात करण्याबाबत तसेच पुरातत्त्व संचालनालयात संचालक तसेच अन्य पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय,

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेन संचालक नेमण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(३) अंशत: खरे आहे.

गट क व गट ड संवर्गातील ६४ रिक्त पदांची कामे नियमानुसार बाह्ययंत्रणेद्वारे करण्यात येत आहे.

(४) नाही.

(५) कामे प्रगतीपथावर आहेत.

(६) व (७) गड संवर्धन समितीच्या शिफारशीनुसार मॉडेल फोर्ट म्हणून विकसित करावयाच्या नगरधन, माणिकगड, अंबागड, तोरणा व भुदरगड या किल्ल्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच संचालक पदाची भरती प्रक्रिया न्यायप्रविष्ठ असून गट ब संवर्गातील ६ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच गट क व गट ड बाबत पद भरतीबाबत घातलेल्या निर्बंधामुळे पदे भरणे शक्य झाले नाही.

-----------------

**राज्याने बफर स्टॉक करुन डाळींचे उत्पादन वाढविण्यासाठी**
**शेतक-यांना प्रोत्साहन देण्याबाबत**

**(७८) * १५५६१ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सूचना देऊनही राज्य शासनाने योग्य उपाययोजना न केल्याने महाराष्ट्रात डाळींच्या किंमती वाढल्याचे मा.केंद्रीय अन्न व पुरवठा मंत्री यांनी जाहिरपणे म्हटले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील वर्षीही तूरडाळीच्या किंमती वाढण्याची शक्यता असल्याने राज्याने बफर स्टॉक करावा तसेच डाळींचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीबाबत मा.केंद्रीय अन्न व पुरवठा मंत्री यांनी राज्य शासनास जबाबदार धरल्याबाबतची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाली होती.

(२) राज्यात राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत १,२५००० हे. क्षेत्रावर खरीप हंगामात आंतरपीक पद्धतीने कडधान्य लागवड कार्यक्रम राबविण्यात आला असून १०,००० हे. क्षेत्रावर संकरीत तूर उत्पादन कार्यक्रम प्रात्यक्षिक राबविण्यात येत आहे.

तसेच कडधान्य पिकांचे उत्पादन वाढ करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शालेय शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्‌यार्थ्यांच्या सहाय्यता निधीत पन्नास टक्के कपात करण्याच्या निर्णयाबाबत**

**(७९) * १६६३६ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्‌यार्थ्यांच्या सहाय्यता निधीत पन्नास टक्के कपात करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यता निधीमध्ये पन्नास टक्के कपात केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णय रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत अपंग विद्‌यार्थ्यांसाठीच्या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये केंद्र शासनाने दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्राद्‌वारे ६०:४० (केंद्र:राज्य) असा बदल केला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(८०) * १५५१७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साठेबाजाकडून जप्त करण्यात आलेली १.१२ लाख टन डाळ शासनाने खुल्या बाजारात पाठविली असून त्यामुळे भाव खाली येण्याची चिन्हे असूनही अद्यापही सर्वसामान्य नागरिकांना परवडणा-या दरात तुरडाळ आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच डाळींच्या प्रकरणात ४२६८ कोटी रुपयांची नफेखोरी झाली असून सदर घोटाळ्याची सी.बी.आय.चौकशी करण्याची मुंबई ग्राहक पंचायतीने माहे डिसेंबर २०१५ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, धान्य, कडधान्य, डाळी, तेल, भाजीपाला आदी वस्तुंचे भाव दिवसेंदिवस वाढत असून उक्त जीवनावश्यक वस्तुंची साठेबाजीही मोठ्या प्रमाणात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील साठेबाजी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठोस मोहिम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, याबाबत मुंबई ग्राहक पंचायतीने सी.बी.आय.चौकशी करण्याची मागणी केली आहे.

(३) राज्यात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे एकंदरीतच अन्नधान्याचे उत्पादन कमी आहे. त्यामुळे बाजरातील आवक कमी झाल्याने भाववाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) राज्य शासनाने दिनांक १९.१०.२०१५ च्या पत्रान्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या जीवनावश्यक वस्तूंवर दिनांक ३०.०९.२०१६ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत.

भविष्यात तूर/तूरडाळ, खाद्यतेल, खाद्यतेल बीया व इतर कडधान्य यांच्या वाढीव किंमती नियंत्रित करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबतचा कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यासाठी, दिनांक २८.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दर नियंत्रक समिती (Price Monitoring Committee) गठित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ईबीसी, पीटीसी व एसटीसी सवलतींचा लाभ देण्याबाबत**

**(८१) * १४९०० श्री.जयंत पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १३८९० ला दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडयातील विनानुदानित खाजगी संस्थामध्ये व्यावसाईक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी देय असलेल्या शिक्षण शुल्काचा प्रतिपूर्तीसाठी सन २०१४-१५ साठी रक्कम रुपये १८७ कोटी २७ लाख इतकी खर्च झाली, त्या रकमेतून दुष्काळाची झळ पोचलेल्या मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी किती रक्कम खर्च करण्यात आली,

(२) तसेच पुणे विभागातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पुणे, नगर, नाशिक या तीन जिल्हयांमधील विद्यार्थ्यांनीच परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्यात आला तर मराठवाडयातून या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे ५० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीपासून वंचित ठेवले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळामुळे त्रस्त असलेल्या मराठवाडयातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ न मिळाल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना शुल्क रुपये १८८ कोटी ९९ लाख इतकी रक्कम देण्याबाबतची कार्यवाही किती दिवसात पूर्ण होईल, तसेच त्यामधून मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी किती रक्कम अदा करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, सन २०१४-१५ चे आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे थकीत शुल्क व सन २०१५-१६ ची सुरु आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे थकीत शुल्क विद्यार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यातील विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी देय असलेल्या सन २०१४-१५ साठीच्या शिक्षण शुल्काच्या प्रतीपूर्तीसाठी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना रुपये तीस कोटी इतके अनूदान देण्यात आले आहे,

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रलंबित रु.१८८.९९ कोटी रक्कमेपैकी रु.१५४.६९ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. त्यामधून मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी उर्वरित दहा कोटी अनुदान दि.३१ मार्च २०१६ पर्यंत देण्यात येणार आहे.

(५) सन २०१४-१५ ची उर्वरित थकबाकी रु.३४.३० कोटी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे, तसेच सन २०१५-१६ या वर्षातील शुल्क प्रतिपूर्ती करण्यासाठी निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुदखेड व भोकर (जि.नांदेड) तालुक्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा खोली बांधकाम करणेबाबत

**(८२) * १८४७६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड व भोकर (जि.नांदेड) तालुक्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळा खोली बांधकाम, स्वच्छता संकुल, किचनशेड इ. विकासकामासाठी बांधकाम अभियंता नसल्यामुळे सुमारे २५ शाळेचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, येथील २५ शाळांमधील विकासकामे करण्यासाठी अभियंता उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) बांधकाम अभियंता नसल्यामुळे बांधकामे प्रलंबित आहेत हे खरे नाही.

(२), (३) व (४) नांदेड जिल्हयातील ३ अभियंत्यांची अन्य जिल्हयात बदली झाली असून २ रिक्त पदांचा कार्यभार अन्य अभियंत्यांना दिला आहे. २३ शाळांमधील भौतिक सुविधांची अपूर्ण कामे पूर्ण करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## कोल्हापूर येथील बालवाडी शिक्षिका, सेवकांना प्रलंबित वेतन व विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याबाबत

**(८३) * १८३६७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील बालवाडी शिक्षिका, सेवकांना प्रलंबित वेतन व विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळावा या मागण्याबाबत बालवाडी शिक्षिका व सेविकांना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने सदर बालवाडी शिक्षिका व सेविकांना प्रलंबित वेतन व विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील महात्मा गांधी विद्‌यालय शाळेच्या विद्‌यार्थ्यांकडून पाईप लाईनचे काम करुन घेतल्याबाबत**

**(८४) * १५५६० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील महात्मा गांधी विद्‌यालयातील शाळेच्या मैदानात पालिकेचे भुयारी गटार योजनेसाठीचे पाईप शाळेबाहेर ठेवण्याचे काम लहान विद्‌यार्थ्यांकडून शिक्षकांनी करुन घेतले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित शाळेच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) याप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशी मध्ये विद्‌यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने फायबरच्या पाईपांचा पटांगणावरील अडथळा दूर करण्यासाठी शिक्षकांना मदत केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षकांना निवृत्ती वेतन देण्याबाबत**

**(८५) * १५७९० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील सेवानिवृत्त शिक्षकांना सन २००३ पासून निवृत्ती वेतन अद्यापी मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील अनेक शिक्षकांचे मृत्यू होऊनही नव्याने निर्माण झालेल्या पालघर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानेही याकडे दुर्लक्ष केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुषंगाने सेवानिवृत्त शिक्षकांना निवृत्ती वेतन त्वरित मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील गरीब व आरक्षित मुलांकरिता बाहेर देशातील विद्यापिठांवर बंधने घालण्याबाबत**

**(८६) * १४८०९ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाहेरच्या देशातील विद्यापीठे राज्यात येण्याबाबत शासन निर्णय घेते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गरीब व आरक्षित मुलांकरिता या विद्यापिठांवर काही बंधने राहणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. अद्याप अशा प्रकारचा निर्णय राज्य शासनामार्फत घेण्यात आला नाही.

(२) आणि (३) प्रश्न उद्भवत नाही

--------------------------

## राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांनी त्यांच्या मागण्यांसाठी आझाद मैदान येथे धरणे आंदोलन केल्याबाबत

**(८७) * १५६८६ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इलेक्ट्रो होमिओपॅथी डॉक्टरांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, डॉक्टरांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी त्यांना भेटण्यास नकार दिल्यामुळे, डॉक्टर वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॉक्टरांच्या मागण्या मान्य करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. दिनांक ११.०१.२०१६ रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० या कालावधीत "इंडियन इलेक्ट्रो-होमिओपॅथी संघर्ष समिती" यांनी संघटीत केलेल्या सुमारे २०० व्यक्तींनी आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई, येथे धरणे आंदोलन केले.

(२) इलेक्ट्रो होमिओपॅथीचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची नोंदवही ठेवण्यात यावी, ही त्यांची मुख्य मागणी आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शासकीय गोदामातील ३२३ पोती शासकीय तांदूळ पिठाच्या गिरणीत पकडल्याबाबत**

**(८८) * १७६८४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शासकीय गोदामातील धान्य परस्पर खासगी दुकान आणि पिठाच्या गिरणीत विकून काळाबाजार करत असताना शासकीय गोदामातील सुमारे ३२३ पोती तांदूळ जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर धान्याचा काळाबाजार करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) अंबरनाथ (जि.ठाणे) येथे शिधावाटप दुकानातील तांदुळाची खुल्या बाजारात विक्री करण्यासाठी नेत असलेला ट्रक कोहजगांव परिसरात ३२३ तांदुळाच्या पोत्यांसह शिधावाटप अधिका-यांनी पकडला असून, ट्रक चालक श्री. नाना महादेव कळगांवकर व त्याचे सहकारी श्री.दिपक हरीभाऊ जाधव व श्री. बाबुराव सुर्वे यांच्या विरुध्द अंबरनाथ पोलिस ठाणे अंबरनाथ जि. ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.II /०१ दिनांक ६/१/२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

-----------------

**ममुराबाद (जि.जळगाव) येथील फार्मसीचे विद्यार्थी**
**शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**

**(८९) * १६५७६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरुणामाई कॉलेज ऑफ फार्मसी, ममुराबाद (जि.जळगाव) येथील सुमारे ६२ विद्यार्थ्यांनी फॉर्म भरतांना महाविद्यालय विनाअनुदानित असताना अनुदानित असे चुकीने लिहिल्यामुळे त्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना सलग ३ वर्षे मिळणारी शिष्यवृत्ती चौथ्या महत्वाच्या वर्षी न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) सदर प्रकरण संस्था स्तरावर लक्षात आल्याने समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून वस्तुस्थिती निदर्शनास आणून विद्यार्थ्यांना अडचणीचे निराकरण केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळसुर्ली, हर्डी, धनगरवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे**
**पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याबाबत**

**(९०) * १५४५३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळसुर्ली, हर्डी, धनगरवाडी (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथे गेली अनेक वर्षे पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर गावांमधील पाणी टंचाई दूर करण्यासाठी नळपाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

सद्यस्थितीत या ठिकाणी पाणी टंचाई नाही. तथापि, येथील पिण्याच्या पाण्याच्या विहिरीतील पाण्याची पातळी एप्रिल नंतर खाली जाते. त्यामुळे पाणी टंचाई जाणवते.

(२) होय.

(३) संभाव्य पाणी टंचाई सन २०१५-१६ च्या कृती आराखड्यात कळसुर्ली, हर्डी, धनगरवाडी, ता.कणकवली येथे तात्पुरती पूरक नळपाणी पुरवठा योजना करणे हे काम समाविष्ट करण्यात आलेले आहे.

सदर कामास मंजूरी देण्याच्यादृष्टीने आवश्यक ती पूर्तता करुन घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) येथील शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून पिवळसर दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(९१) * १५४६० श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) येथील शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेतून पिवळसर दूषित पाणीपुरवठा होत असल्याने तालुक्यातील ५७ गावांतील सुमारे ३ लाख तर शहरातील ३६ हजार नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, नागरीकांच्या आरोग्यास धोका पोहचू नये म्हणून शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

शिरभावी व ८१ गावे (ता.सांगोला, जि.सोलापूर) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रातून क्लोरिनेशन पध्दतीने पाणी शुध्द करुन पाणीपुरवठा केला जातो. तसेच दररोज शुध्द केलेल्या पाण्याची चाचणी घेऊन पाणी शुध्द झालेची खात्री करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात औषधीशास्त्र विभागाने माजी विद्यार्थी महामेळावा आयोजित केल्याबाबत**

**(९२) * १५२०० श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात औषधीशास्त्र विभागाने विद्यापीठ प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता माजी विद्यार्थी महामेळाव्याचा खर्च केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठांतर्गत कोणत्याही खर्चाकरिता विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची परवानगी घेणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कार्यक्रमाकरिता माजी विद्यार्थी संघटनेतर्फे घेण्यात आलेल्या पत्रपरिषदेत विद्यापीठातील एकही पदाधिकारी उपस्थित नव्हता तसेच कुलगुरु व प्र.कुलगुरुंना या पत्रपरिषदेचे निमंत्रण देखील नव्हते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यक्रम मुख्य समन्वयकांवर आणि संयोजकांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ग्रामीण भागातील शाळांना तूरडाळीऐवजी मूगडाळ देण्यात येत असल्याबाबत**

**(९३) * १५३३८ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील शाळांना मागील अनेक महिने तूरडाळीऐवजी मूगडाळ देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या शासनाच्या वतीने पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या आहाराचे वेळापत्रक ठरविण्यात आले असून त्यानुसार त्यांना कडधान्य, मुगडाळ देण्यात येते परंतु मुगडाळीचे वरण खाण्यास विद्यार्थी नापसंती देत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या पोषण आहारात तुरडाळीचे वरण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) माहे ऑक्टोबर, २०१५ ते ३ डिसेंबर, २०१५ या कालावधीत काही जिल्हयांना शिक्षण संचालक यांचे स्तरावरून तूरडाळ ऐवजी मूगडाळ पुरविण्यास मान्यता दिलेली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक जिल्हयात केवळ २ % पर्यंतच यु डायस अपडेट केल्याबाबत**

**(९४) * १४६२२ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमधील शिक्षक, विद्यार्थी, वर्गखोल्या, क्रीडांगण, भौतिक सुविधा, शैक्षणिक प्रगती अशी सर्व माहिती यु डायस मध्ये (युनिफाईड डिस्ट्रीक्स इन्फोर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन) नोंदविण्याच्या सूचना सर्व जिल्हयांना देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु काम गेल्या काही महिन्यापासून सुरु असूनही राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये केवळ २ % पर्यंतच यु डायस अपडेट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यु डायस मध्ये माहिती नोंदविणे सक्तीची असतांनाही राज्यातील १ लाख ६ हजार ८५८ शाळांपैकी केवळ ५५ हजार ८ शाळा यु डायस वर अपडेट केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यु डायस अपडेट साठी यु डायस अपडेट न करणा-या शाळांवर कारवाई करण्याबाबत तसेच विशेष मोहीम राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवरा बु. (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(९५) * १६५८५ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिवरा बु. (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथे सन २००७-०८ सालापासून मंजूर पाणी पुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार गावक-यांनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४० लक्ष रुपये खर्च करुन देखील गावक-यांना शुध्द पाण्यापासून वंचीत रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेवरुन नळ कनेक्शन घेण्यासाठी गावकऱ्यांकडून प्रत्येकी १००० प्रती कनेक्शन एवढी रक्कम वसूल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेसाठी वापरण्यात आलेले साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे तसेच पाण्याच्या टाकीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे या संपुर्ण योजनेची चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेतून थेट उपसा पध्दतीने वितरण व्यवस्थेद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) या विषयी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खामगांव यांचेमार्फत चौकशी आदेशीत केली आहे.

(४) सदर योजनेसंदर्भात उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, खामगांव यांचेमार्फत तांत्रिक चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूरच्या छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयाचे**
**ट्रामा केअर सेंटर उभारणीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(९६) * १७९३९ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरचे राष्ट्रीय महामार्गावरील महत्वाचे स्थान आणि तीन राज्याच्या प्रवेशद्वाराचे भौगोलिक महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाने आपल्या विशेष सहाय्यता निधी अंतर्गत केंद्र शासनाने ५ कोटी २२ लाखाचे अनुदान ट्रामा केअर सेंटर उभारणीसाठी मंजूर करून या अनुदानाचा धनादेश दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ रोजी कोल्हापूर येथील राजर्षी शाहू वैद्यकीय महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करण्यात आलेला असतानाही आजमितीस ट्रामा केअर सेंटर उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालयाच्या अनागोंदी कारभारामुळे ट्रामा सेंटर प्रत्यक्षात कार्यरत होऊ न शकल्यामुळे शेकडो अपघातग्रस्त रुग्णांना उपचाराची संधी गमवावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून ४ वर्षापूर्वी ट्रामा केअर सेंटर उभारण्यासाठी निधी प्राप्त झालेला असतानाही ट्रामा केअर सेंटर उभारणीचे काम हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू ट्रामा केअर सेंटरच्या उभारणीचे काम विनाविलंब हाती घेऊन ट्रामाकेअर सेंटर लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण झाले असून इमारती संस्थेच्या ताब्यात आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) ट्रामा केअर सेंटरची इमारत तयार असून संस्थेच्या ताब्यात आहे. सदर सेंटरसाठी यंत्रसामुग्री खरेदीस शासनस्तरावरुन मान्यता दिली आहे. तसेच तेथील पदनिर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना संस्थेस देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**राज्यातील औषध निर्माणशास्त्र संस्थेतील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळणेबाबत**

**(९७) * १७४६२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७४६ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अनुदान मिळणाऱ्या १९ औषधनिर्माणशास्त्र संस्था राज्यभर कार्यरत असून त्यांना सन १९८५ पासून नियमित वेतन अनुदान व इतर अनुदाने देण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१५ पासून राज्यातील अनेक औषधनिर्माणशास्त्र संस्थेतील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा केले जात नसल्यामुळे कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर अनुदान थकीत राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, नवीन एचटीई सेवार्थ प्रणालीनुसार वेतन वितरीत करुन थकीत वेतन व्याजासह अदा करण्यासाठी तसेच संस्था अनुदान वितरीत करतांना होणाऱ्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

चालु आर्थिक वर्षातील अंदाजित मासिक वेतन व भत्ते खर्चाबाबत संस्थेने सादर केलेली आकडेवारी तसेच मागील आर्थिक वर्षातील समायोजित करावयाची कमी/अधिक शिल्लक रक्कम विचारात घेऊन माहे नोव्हेंबर, २०१५ (डिसेंबर, २०१५ मध्ये देय) पर्यंत देय वेतन अनुदान संस्थांना वितरीत करण्यात आलेले आहे. त्यापुढील वेतन व भत्ते एचटीई सेवार्थ प्रणालीतूनच अदा करावयाची आहे. त्यामुळे ज्या संस्थांनी सेवार्थ प्रणालीतून वेतनाची देयके सादर केलेली नाहीत केवळ अशा संस्थांचे वेतन अनुदान अदा होऊ शकलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याबाबत

**(९८) * १७८४० श्री.गिरीशचंद्र व्यास, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाच हजारांहून अधिक शाळांमधील सुमारे १ लाख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अल्पवेतनावर काम करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांच्या फीमधून संस्थाचालकांना प्रचंड नफा मिळत असताना त्या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना मात्र अल्पवेतनावर वेठबिगारासारखे राबविले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदरहू संस्था चालक व शाळांना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन आयोगाप्रमाणे पगार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) दिनांक २१/५/२०१० च्या शासन निर्णयान्वये विनाअनुदानित शाळांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याचे आदेश देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

------------------------

**मौजे भावेघर (ता.वाडा, जि.पालघर) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षकांअभावी बंद पडल्याबाबत**

**(९९) * १५८९० श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भावेघर (ता.वाडा, जि.पालघर) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्या किती आहे व या शाळेसाठी शिक्षकांची किती पदे मंजूर आहेत,
(२) शाळेत शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याने पालकांनी शाळेला टाळे ठोकल्याची घटना दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) या शाळेत एकही शिक्षक उपस्थित नसल्याची कारणे काय आहेत,
(४) सदर शाळेत एकही शिक्षक उपस्थित नसल्याने शाळा किती दिवस बंद होती,
(५) विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या व कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) मौजे भावेघर (ता.वाडा, जि.पालघर) येथील जिल्हापरिषद शाळेचा पट ५४ असून २ शिक्षकांची पदे मंजूर आहेत.
(२) हे खरे नाही.
(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुण्यातील सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेत कार्यरत असणाऱ्या प्राध्यापक व कर्मचारी यांना वेतन न मिळाल्याबाबत**

**(१००) * १६१९१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेच्या अध्यक्षांच्या परिचयाच्या गृहनिर्माण प्रकल्पात घरे घेतल्यास आगाऊ रक्कम वेतनापोटी दिली जाईल असे संस्थेचे संस्थापक यांनी परिपत्रक काढले असून प्राध्यापकांचे तसेच कर्मचा-यांचे ५ महिन्यांचे वेतन दिले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अध्यक्षांच्या या जाचक निर्णयामुळे संस्थेतील प्राध्यापकांवर तसेच कर्मचा-यांवर उपासमारीची पाळी निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कर्मचाऱ्यांना थकीत वेतन व सध्या देय असलेले वेतन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) यासंदर्भातील वृत्त दैनिक लोकसत्ता मध्ये दिनांक ९/०१/२०१६ रोजी प्रसिद्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) यासंदर्भात चौकशी करण्याचे निर्देश संचालक, तंत्रशिक्षण यांना दिलेले आहेत.

(४) सदरचे महाविद्यालय हे खाजगी कायम विनाअनुदानित तत्वावरील असून या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे. तथापि, सिंहगड तंत्रशिक्षण संस्थेच्या तक्रारी संदर्भात चौकशी करण्याचे निर्देश संचालक, तंत्रशिक्षण यांना दिले आहेत. तसेच याप्रकरणी सर्व संबंधितासमवेत विचार विनिमय करुन स्थानिक पातळीवर आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील माध्यमिक शाळा कर्मचा-यांची वैद्यकीय देयके प्रलंबित असल्याबाबत

**(१०१) * १५१६७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील दिनांक १ जून २०१४ पासून दिनांक ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील वैद्यकीय अधिकारी यांचेकडून मंजूर होऊन आलेली माध्यमिक शाळा कर्मचा-यांची अनेक वैद्यकीय बिले शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सोलापूर यांनी प्रलंबित ठेवली आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बिले थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत व संबधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच वैद्यकीय बिले तात्काळ मंजूर करून संबधित कर्मचा-यांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इस्माईल युसूफ कॉलेज, जोगेश्वरी ही संस्था व तिची जागा अंजुमन इस्लामकडे सुपूर्द करण्याबाबत

**(१०२) * १५१६३ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२३९८ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्माईल युसूफ कॉलेज, जोगेश्वरी ही संस्था व तिची जागा अंजुमन इस्लामकडे सुपूर्द करण्याबाबत आणि तिथे जागतिक दर्जाचे विद्यापीठ उभे करण्याबाबत इस्माईल युसूफ कॅम्पस बचाव संघर्ष समितीने केलेल्या मागणीबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या मागण्या व त्यावर शासनाची भूमिका व कार्यवाही काय आहे,

(३) असल्यास, या कॉलेजसाठी १९१४ मध्ये वक्फद्वारे देणगी देऊन मोहम्मद इस्माईल यांनी कॉलेज उभारणीसाठी घातलेल्या अटी व शर्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

संबंधीत जागेबाबत मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१८८४/१९९९ दाखल असून ती अद्याप प्रलंबित आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात संगणक शिक्षकांना कायम स्वरूपी नियुक्ती देण्याबाबत**

**(१०३) * १५३२३ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शालेय विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यासाठी २००८ मध्ये आय सी टी योजना सुरु केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्यात केंद्रशासन पुरस्कृत आयसीटी योजनेअंतर्गत सन २००८ मध्ये प्रथम टप्प्यात ५०० निदेशक, २०१० मध्ये टप्पा २ मध्ये २५०० शिक्षक आणि २०१३ मध्ये टप्पा ३ अंतर्गत ५००० निदेशक असे एकूण ८००० संगणक निदेशकांची १०,०००/- रुपये मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीनुसार नियुक्त्या करण्यात आल्या, हे खरे आहे

(३) असल्यास, प्रत्यक्षात या संगणक निदेशकांना दरवर्षी ११ महिन्याच्या करारावर नियुक्त करुन कंत्राटदार कंपन्याकडून प्रत्यक्ष या संगणक निदेशकांना केवळ ३२०० रुपये इतकेच मानधन देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यात ८ हजार शिक्षकांना बुट तत्वावर ५ वर्षा साठी नेमणूक देण्यात आली असल्याने या शैक्षणिक सत्रात त्याचा कार्यकाल संपणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने या संगणक निदेशकांना पंजाब, गोवा, हरियाणा, बिहार, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश, राज्यस्थान या राज्याच्या धोरणात्मक निर्णयानुसार कायम सेवेत सामावून घेण्याची मागणी या निदेशक संघटनांद्वारे व नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, ह्या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही या संगणक शिक्षकांना शासन शिक्षकांचे पद निर्माण करून कायम स्वरूपी नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे

(३), (४), (५) व (६) आयसीटी ही केंद्र पुरस्कृत योजना असून ती BOOT तत्वावर चालविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत संगणक निदेशकांची नियुक्ती संबंधित कंपन्यांमार्फत कंत्राटी तत्वावर करण्यात येत असल्याने शिक्षकांचे कायमस्वरुपी पद निर्माण करण्याबाबत प्रश्न उद्‍भवत नाही.

(७) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्‍यालयांना १०० टक्के वेतन अनुदान देण्याबाबत**

**(१०४) * १५८७८ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्‍यालयांना १०० टक्के वेतन अनुदान द्‍यावे याबाबत संबंधित संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी अद्‍याप निर्णय न होणेबाबतची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) शासन स्तरावरुन संबंधित प्रस्ताव अमान्य करण्यात आले आहेत.

-----------------

**शाळेतील सर्वच मुलांना सरसकट पोषण आहार देण्याबाबत**

**(१०५) * १४८६७ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानित वर्गातील मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारात खिचडी दिली जाते तर विनाअनुदानित वर्गातील मुलांना खिचडी दिली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित व विनाअनुदानित असा भेदभाव न करता शाळेतील सर्वच मुलांना पोषण आहार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शालेय पोषण आहार हि केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. शासकिय, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा, बालकामगार प्रकल्प इ. मध्ये इ.१ ली ते ८ वी च्या वर्गात शिकणारे विद्यार्थी सदर योजनेचे लाभार्थी आहेत. विनाअनुदानित शाळांना सदर योजना लागू नाही.

(३) सन २०१५-१६ साठीच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकासाठी केंद्र शासनाकडे झालेल्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीमध्ये विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याची मागणी केंद्र शासनाकडे केली होती. तथापि, सदर विनंती केंद्र शासनाने अमान्य केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### अकोला, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यात शासकीय गोदामे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०६) * १६७६६ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातील शासकीय गोदामे बंद करुन भारतीय खाद्य निगमचे अन्न सुरक्षेचे धान्य खाजगी गोदामात ठेवण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय धान्य खाजगी गोदामात ठेवण्यात येत असल्याने या धान्यांचा काळाबाजार होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विदर्भात शासकीय गोदामे उपलब्ध करण्याबाबत तसेच अन्न सुरक्षेचे धान्य काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील फ्री स्टाईल स्केटींग खेळात नैपुण्य मिळवणारे खेळाडू शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(१०७) * १६४३८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ८०५१ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये फ्री स्टाईल स्केटिंग या खेळात राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या क्रीडा संघटनेकडून किंवा क्रीडा विभागाकडून प्रदीर्घ कालावधीपासून प्रमाणपत्र न दिल्यामुळे शेकडो गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ मध्ये शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्यातील फ्री स्टाईल स्केटिंग मध्ये प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यामध्ये फ्री स्टाईल स्केटिंग या खेळात राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र या क्रीडा संघटनेव्दारे प्रमाणपत्रे दिली जातात.
(२), (३) व (४) सन २०१५-१६ या शालेय वर्षात जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरीय शालेय स्केटींग व रोलर हॉकी या स्पर्धांचे आयोजन राष्ट्रीय फेडरेशनव्दारे करण्यात आले होते. राष्ट्रीय फेडरेशन कडून प्राप्त झालेली प्रमाणपत्रे राज्य संघटनेव्दारा जिल्हा प्रतिनिधींना व त्यांच्यामार्फत सर्व खेळाडूंना सप्टेंबर, २०१५ मध्ये वितरीत करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईसह राज्यातील अनेक शाळेमध्ये नर्सरी प्रवेशासाठी नियम करणेबाबत**

**(१०८) * १६१७२ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.विक्रम काळे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक शाळांमध्ये नर्सरी प्रवेशासाठी शासनाचे धोरण ठरविले नसल्यामुळे व नियम नसल्याने इंग्रजी शाळा प्रवेश मिळविणे कठीण व आर्थिक खर्चाचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शाळा प्रवेशासाठी वयाची ३ वर्षे पूर्ण बालकाला नर्सरीमध्ये तर ५ वर्षाच्या मुलांना पहिलीत प्रवेश मिळेल याबाबतचा आदेश जारी करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नर्सरीचे प्रवेश सुखकर व योग्य प्रमाणात असावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) इ. १ ली पासूनचे शिक्षण शासनाच्या नियंत्रणाखाली आहे. नर्सरी प्रवेश शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली नाहीत.

(२) शाळा प्रवेशांचे किमान वय दिनांक २१ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली असून दिनांक २३ जानेवारी, २०१५ च्या शुध्दीपत्रकान्वये सदर निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून करण्यात येणार आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ५० पैशापैक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा घेतलेला निर्णय

**(१०९) * १५२८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५० पैशापैक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिक्षा शुल्क माफीचा लाभ विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे परिक्षा शुल्क माफीचा लाभ मिळत नसल्याने विनाअनुदानीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय व अनुदानित महाविद्यालयांप्रमाणे विनाअनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही परिक्षा शुल्क माफ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. शासन प्रचलित १९९३ च्या धोरणाप्रमाणे शुल्क माफ करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला येथील लाल बहादुर शास्त्री क्रीडांगण येथे नियमित सराव करणाऱ्या फुटबॉल खेळांडूना प्रशासनाने प्राथमिक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११०) * १६१९६ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील लाल बहादुर शास्त्री क्रीडांगण येथे नियमित सराव करणाऱ्या फुटबॉल खेळांडूना प्रशासनाने प्राथमिक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी विर्दी फुटबॉल क्लबच्यावतीने जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मैदानाची मोठया प्रमाणात दुरवस्था झालेली असून खेळाडूंना कोणतीही सोई-सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फुटबॉल खेळांडूना प्राथमिक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. सदर मैदानावर जिल्हा क्रीडा संकुल समिती, अकोला यांच्या वतीने प्राथमिक स्तरावरील आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनदी (जि.ठाणे) मधील वाढते प्रदुषण रोखण्याबाबत

**(१११) * १७२२७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २९८८ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) उल्हासनगर येथील खेमाणीनाला आणि म्हारळ येथील डंपिंग ग्राउंडचे दुषित पाणी म्हारळ दरम्यान उल्हास नदीत मिसळत असून या नदीपात्रातून पाणी पुरवठा होत असलेल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी व मीरा-भाईंदर या महानगरपालिकेतील लाखो नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून पर्यावरणाचा -हास होऊन नदी पात्रातील जलसंपत्तीवरही विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थेने या आधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अंतिम अहवालामध्ये खेमाणीनाला वळविणे तसेच लहान उद्योग धंद्यातील दुषित पाण्यावर शुद्धीकरण प्रक्रिया करून ते पाणी नदी पात्रात सोडण्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगरच्या खेमाणीनाल्याचे तसेच डंपिंगचे दुषित पाणी प्रक्रिया न करताच थेट उल्हास नदीपात्रात मिसळत असून त्यामध्ये कचरा, मृत जनावरांचे अवशेष, मानवी मैला असे शरीरास घातक विषारी घटक येत आहेत, याचा परिणाम नदीपात्रात होऊन शेवाळ आणि जलवनस्पतीचे प्रमाणही खूप वाढले आहे तसेच स्थलांतरित होणाया पक्षांची संख्या दिवसें-दिवस घटत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उल्हास नदीपात्रात मिसळणा-या दुषित पाणी व शरीराला घातक विषारी घटकास विनाविलंब कायमस्वरूपी आळा घालण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अंशत : खरे आहे.

सद्यस्थितीमध्ये उल्हासनगर महानगरपालिके कडून अंदाजे १० एम.एल.डी. विनाप्रक्रियायुक्त सांडपाणी खेमाणी नाल्याद्वारे उल्हासनदीत मिसळते. म्हारळ येथील अनाधिकृत डंपिंग ग्राउंडमध्ये कच-याची कुठलीही प्रक्रिया केली जात नाही. तसेच यामध्ये निर्माण होणारे दुषित पाणी विनाप्रक्रियाकरता वरील नाल्यामध्ये विसर्जित होते.

(२) लहान उद्योग धंदयातील दुषित पाण्यावर शुध्दीकरण प्रक्रिया करण्याकरिता संयंत्रणा बसविण्याच्या कामाचे कार्यादेश दिले असून पुढील काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४)

(अ) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सांडपाणी संयंत्रणा बसविण्याकरिता तसेच नागरी घन कचरा व व्यवस्थापनाबाबत वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्थेस निर्देश दिलेले आहेत.

(ब) या परिसरातील प्रदूषण कमी करण्याच्यादृष्टीने मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशानूसार, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

(क) राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करण्याकरिता आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीकडून देखील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (अमरावती) येथील**
**प्राचार्य व्ही.झेड.गंधारे यांचे निलंबन रद्द करण्याबाबत**

**(११२) * १७४८८ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १६ व २३ डिसेंबर, २०१५ व दिनांक १९ जानेवारी, २०१६ अशा तीन तारखांना, तीन वेगवेगळी पत्र मा.महसूल मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री, मा.तंत्रशिक्षण मंत्री, संचालक तंत्रशिक्षण यांना देऊन, अमरावती येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.झेड.गंधारे यांचे निलंबन रद्द करुन, त्यांना पुन्हा कामावर रुजु करुन घेतल्यास त्यांच्यावर चालु असलेल्या चौकशीवर त्याचा विपरीत परिणाम होईल असे पत्रात नमूद करुन ती पत्रे पाठविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.पी.एम.खोडके यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने १९ निष्कर्ष काढत, श्री.गंधारे यांनी अपहार व गैरव्यवहार केल्याचे नमूद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.पी.एम.खोडके यांच्या चौकशी समितीने काढलेल्या १९ निष्कर्षांपैकी महत्वाचे निष्कर्ष कोणते, व या सर्व निष्कर्षांची पूर्णपणे चौकशी न करता व्ही.झेड.गंधारे यांना त्यांचे निलंबन रद्द करुन पुन्हा कामावर रुजु करुन घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) श्री.गंधारे हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद येथे प्राचार्य या पदावर कार्यरत असताना त्यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या प्राथमिक चौकशी समितीने आर्थिक अनियमितता झाल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील तात्कालीन प्राचार्य श्री.गंधारे यांची याप्रकरणी विभागीय चौकशी सुरु करुन त्यांना दिनांक १४.१०.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. तद्नुतर सक्षम शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांच्या मान्यतेनंतर श्री.गंधारे, यांना दिनांक १९.०१.२०१६ च्या आदेशान्वये सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे. श्री.गंधारे हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१.०१.२०१६ रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे.

-----------------

**नागपूर शहरातील चारशे शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याबाबत**

**(११३) * १६६३८ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील चारशे शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याबाबतचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने किती शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा नसल्याचे आढळून आले,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) नागपूर शहरातील १५६ प्राथमिक व ८८ माध्यमिक शाळांमध्ये अग्निशमन यंत्रे नसल्याचे आढळून आले आहे.

(४) सदरहू शाळांना तात्काळ अग्निशमन यंत्र बसविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उरण येथील जलवाहिन्यांची दुरुस्ती करुन नियमीत पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(११४) * १५५७९ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण येथील जेएनपीटी बंदरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलवाहिन्या नादुरुस्त झाल्याने मागील ३ महिन्यांपासून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, येथील नादुरुस्त जलवाहिन्यांची दुरुस्ती करुन येथे नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे. यावर्षी कमी पर्जन्यमानामुळे मोरबे धरणातून होणारा सरासरी १५ ते २० द.ल.लि. पाण्याचा पुरवठा नवी मुंबई महानगरपालिकेकडून ऑक्टोबर, २०१५ पासून बंद करण्यात आला असल्याने अपुरा पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) व (३) होय, जवाहरलाल नेहरु बंदरात पाणी पुरवठा करणारी १३२० मी.मी. व्यासाची जलवाहिनी २८ वर्षे जुनी असून पाण्याचा दाबाने वारंवार फुटत असते. फुटलेल्या जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येतो. या जुन्या जलवाहिन्या बदलण्याच्या व वाढीव क्षमतेच्या रु. २८२.३८ कोटी इतक्या रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असुन सहभागी संस्थासोबत करारनामा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यात पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्यालय नसल्याबाबत**

**(११५) * १८०४० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यात पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्यालय नसल्याने विद्यार्थ्यांची क्षमता असूनही पदव्युत्तर शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च शिक्षणासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना दररोज २५ ते ३० कि.मी. प्रवास करुन अन्य जिल्हयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, डहाणू येथे मेडिकल, अभियांत्रिकी, विधी, तंत्रशिक्षण शिक्षणक्रमांचे महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) पालघर जिल्हयात पदव्युतर शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणारी महाविद्यालये आहेत. त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या सन २०१६-१७ च्या बृहत आराखड्यानुसार पारंपारिक पदव्युत्तर अभ्यासक्रम मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झालेले आहेत.

शासनाच्या प्रत्येक जिल्हयात किमान एक तंत्र निकेतन महाविद्यालय धोरणानुसार पालघर जिल्हयातील विक्रमगड येथे शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयाची स्थापन केलेली आहे.

पालघर व डहाणू येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन नाही. तथापि, खाजगी संस्थेने वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केल्यास व आवश्यक त्या निकषांची पुर्तता करीत असल्यास आवश्यक ते प्रमाणपत्र देण्यांसदर्भात शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात येतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मराठी चित्रपट काढण्याकरिता शासनाच्या नविन अनुदान पध्दतीबाबत**

**(११६) * १४८११ श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठी सिनेमा काढण्याकरिता शासनाच्या अनुदानाबाबत नविन पध्दत काढण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचा उद्देश काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सद्यस्थितीत कोणते अनुदानाबाबत निकष लावण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) विभागाची दिनांक ११.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्याची योजना दिनांक ३०.१०.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आली.

(२) कालानुरुप चित्रपट निर्मिती तत्रज्ञानात झालेले बदल, चित्रपट निर्मिती खर्चात झालेली वाढ यामुळे मराठी चित्रकर्मींकडून होत असलेल्या मागण्या विचारात घेऊन योजना सुधारीत करण्याचा शासनाचा उद्देश होता. त्याप्रमाणे चित्रपत्र निर्मिती अर्थसहाय्याच्या रकमेत वाढ करणे, प्रथम चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्यास पात्र ठरविणे, डिजिटल कॅमेऱ्याचा वापर करुन कमीतकमी २ के रिझॉल्यूशन मध्ये चित्रित चित्रपटांनाही अर्थसहाय्यासाठी पात्र ठरविणे इत्यादी सुधारणा योजनेमध्ये करण्यात आल्या.

(३) योजनेतील अटी व शर्तीची पूर्तता करुन विहित नमुन्यात निर्मिती संस्थेने अर्ज सादर केल्यानंतर चित्रपट परिक्षण समितीमार्फत चित्रपटांचे परिक्षण करण्यात येते. यासाठी चित्रपट कथा, दिग्दर्शन, गीत, संकलन, अभिनय इत्यादी बाबींस अनुलक्षून गुणांकन पध्दत अवलंबिण्यात येऊन चित्रपटास “अ”, “ब” व “अपात्र” दर्जा निश्चित करण्यात येतो.

-----------------

## जळगाव जिल्ह्यात विशेषतः जळगाव शहरातील शाळाबाह्य मुलींबाबत

**(११७) * १६६६३ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात विशेषतः जळगाव शहरात शाळाबाह्य मुलींची संख्या जिल्ह्यात सर्वात जास्त असल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच आर्थिक स्थिती गरिबीची असल्याने अनेक पालक फक्त मुलांनाच शाळेत पाठवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात साखरेच्या भावात भरमसाठ वाढ होत असल्याबाबत

**(११८) * १५५०५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंदराव पाटील, श्री.जर्नादन चांदूरकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साखरेची मोठ्याप्रमाणात साठेबाजी होत असल्यामुळे सध्या साखरेचे भाव भरमासाठी वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखरेचा साठा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच वाढलेली भाव वाढ रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) माहे जून, २०१५ मध्ये साखरेचा सरासरी दर रू. २१५५ प्रति क्विंटल असा होता. सदर सरासरी दर माहे जानेवारी, २०१६ मध्ये रू. ३०९५ प्रतिक्विंटल एवढा झाला आहे. त्यामुळे साखरेच्या दरात वाढ झालेली आहे.

(२) व (३) साखरेवर सद्य:स्थितीत केंद्र शासन तसेच राज्य शासनाकडून साठा मर्यादा लावण्यात आलेली नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(११९) * १५४६३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असल्याने टँकरच्या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार पाण्याच्या या भीषण टंचाईवर मात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१५-१६ वर्षासाठी ऑक्टोबर, २०१५ ते जुन, २०१६ पर्यंत पाणी टंचाई दूर करण्यासाठी टंचाई आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे.
संगमनेर तालुक्यात टंचाई कृती आराखड्यात रुपये १०१५.०५ लक्ष किंमतीच्या एकूण १९१ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत २८ टँकरद्वारे १८ गावे व १५० वाड्यांना पाणीपुरवठा चालू आहे. टँकर भरणेसाठी ४ उद्भव व २ गावांसाठी २ विहिरी अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील सुपर स्पेशलिटी रुग्णालयातील रक्तघटक खाजगी ब्लड बँकेतून आणत असल्याबाबत

**(१२०) * १५२६० श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ११००२ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील सुपर स्पेशलिटी रुग्णालयातील शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णांना लागणारे रक्तघटक खाजगी ब्लड बँकेतून मागविले जातात व त्याला लागणारे शुल्क रुग्णाकडून वसूल केले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ब्लड बँकेमध्ये सर्व गटाचे रक्तघटक उपलब्ध असतात त्यांच्याकडे कोणतीही लेखी व मौखिक विचारणा न करताचा खाजगी ब्लड बँकेतून रक्तघटक मागविले जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी ब्लड बँकेमधून मागविण्यात येत असलेले शस्त्रक्रिये दरम्यान लागणारे रक्तघटक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ब्लड बँकेमधून मागविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे रक्तपेढी कार्यरत आहे. सदर रुग्णालयामध्ये नियोजित शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर शस्त्रक्रियांकरिता लागणारे Whole Blood संस्थेच्या रक्तपेढीतून उपलब्ध करण्यात येते. अपरिहार्य कारणास्तव संस्थेच्या रक्पेढीमध्ये शस्त्रक्रियेकरिता आवश्यक असणाऱ्या रक्तगटाची उपलब्धता नसल्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व

रुग्णालय, नागपूर येथील रक्तपेढीतून त्याची मागणी करण्यात येते. त्याकरिता रुग्णाास कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. परंतु, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णायल, नागपूर येथील रक्तपेढीमध्ये देखील काही विशिष्ट रक्तगटाचे रक्तघटक उपलब्ध नसल्यास, खाजगी रक्तपेढीतून रक्तघटकाची मागणी करण्यात येते.

-----------------

**पुणे येथे महाराष्ट्र केसरी गादी गटातील चुरशीच्या लढत वेळेस मल्लाला काही प्रेक्षकांनी डिवचल्याबाबत झालेली हाणामारी**

**(१२१) * १५३४७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र केसरी गादी गटातील चुरशीची लढत दिनांक ९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास झाली त्या वेळेस पुण्याच्या राहुल खाणेकर या मल्लाला काही प्रेक्षकांनी डिवचल्यामुळे सदरहू मल्लाच्या पाठिराख्यांनी केलेल्या बाचाबाचीत हाणामारी झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद यांच्यावतीने ५९ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०१५-१६ या स्पर्धेचे आयोजन दिनांक ६ ते १० जानेवारी, २०१६ या कालावधीत नागपूर येथे करण्यात आले होते. या संदर्भात सदर स्पर्धा काळात प्रेक्षक बसण्याच्या ठिकाणी प्रेक्षकामध्ये बसण्याच्या वादावरून हुल्लडबाजी झाल्याने तेथील पोलिस कर्मचाऱ्यांनी संबंधितांवर कारवाई केली असल्याची बाब सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कुस्तिगिर संघटना यांनी दिनांक ०१.०३.२०१६ रोजीच्या अहवालाव्दारे शासनाच्या निर्दशनास आणली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ग्रामीण भागात नॉन ब्रान्डेड पदार्थांची खुलेआम विक्रीबाबत**

**(१२२) * १४६२५ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हातील ग्रामीण भागात शुद्धतेची कोणतीच नोंद नसलेल्या नॉन ब्रान्डेड चटपटीत पदार्थांची खुलेआम विक्री होत असूनही या प्रकाराकडे अन्न व औषध प्रशासन विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पदार्थांवर एक्सपायरी डेट, यात वापरण्यात आलेल्या अन्न घटकांची नोंद नाही तरीही या घातक पदार्थांच्या विक्रीतून महिन्याकाठी कोट्यावधीची उलाढाल अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्याच्या संगनमताने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यात अशा प्रकारची घटना निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) लागू नाही. अशा प्रकारची घटना/तक्रार प्रशासनाच्या यवतमाळ कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव शहरात स्वस्त धान्य दुकानातून धान्याचा अपहार होत असल्याबाबत**

**(१२३) * १६५९२ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव शहरातील प्रतापनगर, दालफैल भागातील स्वस्त धान्य दुकानदार अनेक महिन्यापासून स्वस्त धान्य दुकानातील मालाचा अपहार करीत असून सदरचा माल रेशनकार्ड धारकांना मिळत नाही अशी तक्रार श्री.विलास राठोड व श्री.शंकर खिरडकर हे मागील ७ ते ८ महिन्यापासून तहसिलदार, खामगांव यांच्याकडे तक्रार करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारकर्त्यांच्या तक्रारीची दखल तहसिलदार, खामगांव यांनी घेतली नसल्यामुळे या लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार स्वस्तधान्य दुकानदार याचा परवाना रद्द करुन तक्रारीकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी चौकशी केली असता, दुकानदाराने शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरीत केल्याचे दिसून आले. तरी सदर तक्रारीत तथ्य नसल्याचे दिसून येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आल्याबाबत**

**(१२४) * १७९४३ श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ८८१७ ला दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'मराठी भाषा पंधरवडा' साजरा करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग व मराठी भाषा विकास संस्था यांच्या मार्फत राज्याच्या सर्व विभागांना तसेच राज्यातील शैक्षणिक संस्था शासकीय/निमशासकीय कार्यालयांना व राज्य शासनाच्या आधिपत्याखालील वा राज्यातील सर्वच आस्थापनांना 'मराठी भाषा पंधरवडा' साजरा करण्याबाबत सूचित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आस्थापनांनी 'मराठी भाषा पंधरवडा' साजरा केल्याचे अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत काय,
(४) राज्याची मराठी मातृभाषा असताना तिच्या संवर्धन व प्रसार कार्यात दिरंगाई करणा-या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत सर्व सरकारी/निमसरकारी कार्यालये, राज्यातील कैंद्र शासनाच्या अखत्यारीतील कार्यालये, मंडळे/सार्वजनिक उपक्रम व सर्व खाजगी, व्यापारी बँका, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये इ. कार्यालयांना दि. २२.७.२०१५ व दि. ५.१२.२०१५ च्या आदेशान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने सदर कालावधीत संबंधीत विभाग/कार्यालय प्रमुखांनी स्वयंप्रेरणेने पंधरवडा साजरा करणे अभिप्रेत असल्याने दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील गैरव्यवहाराबाबत

**(१२५) * १७४८१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांच्या कार्यालयात सन २०१३-१४ वर्षातील विशेष घटक योजनेंतर्गत व्यायामशाळा बांधकामातील गैरव्यवहारासंदर्भात शासनाने आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच महालेखापाल, नागपूर व कोषागार कार्यालय, बीड यांची फसवणूक व मर्जीतील संस्थांना अनुदान वाटप अशा अनियमिततेबाबत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना शासनाने चौकशीचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन अनियमिततेबाबत दोषीविरुध्द तसेच तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या गैरव्यवहाराबाबत वेळोवेळी झालेल्या चैकशी अहवालातील निष्कर्षानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय.
(३) या प्रकरणी चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.